
रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १९ ◆ अंक ५४
www.ramprahar.com

◆ बुधवार, ९ सप्टेंबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## गणेशभक्तांच्या कोकण प्रवासासाठी टोलमाफी



**मुंबई :** गणेशोत्सवासाठी कोकणात आपल्या मूळ गावी जाणाऱ्या लाखो गणेशभक्तांना राज्य शासनाने मोठा दिलासा दिला आहे. यंदाही गणेशोत्सवाच्या काळात कोकणाकडे जाणाऱ्या वाहनांना टोल (पथकर) माफ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रसिंहराजे भोंसले यांनी याबाबतची अधिकृत माहिती दिली. यासंदर्भातील शासन परिपत्रकही जारी करण्यात आले आहे. मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्ग, मुंबई–बंगळुरू राष्ट्रीय महामार्ग, अटलबिहारी वाजपेयी शिवडी–न्हावा शेवा अटल सेतूसह सार्वजनिक बांधकाम विभाग आणि एमएसआरडीसीच्या अखत्यारीतील कोकणाकडे जाणारे सर्व संबंधित रस्त्यांवर ११ ते २७ सप्टेंबर या कालावधीत टोलमाफी लागू राहील. टोलमाफीचा लाभ घेण्यासाठी वाहनांवर विशेष स्टिकर/पास असणे आवश्यक आहे.

अंतरंग

‘पावसाअभावी करपलेल्या पिकांचे पंचनामे करा’/२

दिघी हद्दीत पुन्हा गोमांस जप्त; दोघे ताब्यात/५

नमन धीरचे टी-२० लीगमध्ये वादळी शतक/८

## जेएनपीटीसह मालवाहतूक रेल्वे मार्गिकेच्या तीन टप्प्यांचे राष्ट्रार्पण

# देशाच्या लॉजिस्टिक व्यवस्थेला नवी गती -पंतप्रधान मोदी

**उरण : रामप्रहर वृत्त**

पश्चिम आणि पूर्व समर्पित मालवाहतूक रेल्वे मार्गिका पूर्ण झाल्यामुळे देशाच्या मालवाहतूक क्षेत्रात ऐतिहासिक परिवर्तन घडत आहे. जेएनपीटी बंदरातून डबल–स्टॅक कंटेनर पहिली मालगाडी मार्गस्थ होणे ही या परिवर्तनाची महत्त्वपूर्ण कामगिरी आहे. आता एका मालगाडीमधून मुंबईहून २५०पेक्षा अधिक ट्रक इतका माल वेगाने वाहून नेता येणार आहे. त्यामुळे मालवाहतुकीचा वेळ व खर्च कमी होईल. ही बाब देशाच्या लॉजिस्टिक व्यवस्थेला एक नवी गती व दिशा देणारी ठरेल, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी (दि.८) केले.







(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

पश्चिम समर्पित मालवाहतूक रेल्वे मार्गिकेच्या ३२६ किमी लांबीच्या आणि २० हजार ७०० कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्चाच्या तीन महत्त्वपूर्ण टप्प्यांचे राष्ट्रार्पण पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते वडोदरा (गुजरात) येथून व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे करण्यात आले. यावेळी जेएनपीटी येथील डबल स्टेक मालगाडीसह इतर तीन मार्गांवरील मालवाहतूक सेवांनाही हिरवा झेंडा दाखवण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

जेएनपीटी येथे आयोजित कार्यक्रमास राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार, रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री भरत गोगावले, महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, राज्यपाल महोदयांचे विशेष कार्य अधिकारी डॉ.प्रशांत नारनवरे, जपानच्या मुंबईस्थित वाणिज्य दूतावासाच्या महावाणिज्यदूत सातो हितोमी, डीएफसीसीआयएलचे व्यवस्थापकीय संचालक प्रवीण कुमार, विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल, जिल्हाधिकारी किशन जावळे, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, मध्य रेल्वेचे महाप्रबंधक राजीव श्रीवास्तव, प्रांताधिकारी पवन चांडक आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पंतप्रधान मोदी यांनी देशामध्ये २०१४नंतर पायाभूत सुविधांच्या विकासाला मिळालेल्या वेगाचा उल्लेख करताना पूर्व व पश्चिम समर्पित मालवाहतूक रेल्वे मार्गिका यशस्वीपणे पूर्ण झाल्याचे सांगितले. ही मार्गिका देशाच्या व्यापारी व्यवस्थेत मूलभूत परिवर्तन घडवून आणत असून त्या राष्ट्रीय व्यापाराचा आधार बनत असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रवासी आणि मालवाहतूक रेल्वे स्वतंत्र झाल्यामुळे दररोज ४३०पेक्षा अधिक मालगाड्या धावू शकतात. ट्रकने लागणारा सुमारे ३० तासांचा प्रवास आता १० ते १२ तासांत पूर्ण होऊ शकतो. १०० किमी अंतर पार करण्यासाठी लागणारा वेळ पूर्वीच्या तुलनेत निम्म्यापेक्षाही कमी झाला आहे. त्यामुळे इंधनाची बचत, मालवाहतुकीच्या खर्चात घट आणि पर्यावरणाचे संरक्षण यांसारखे अनेक फायदे होत आहेत. एका मार्गिकेत गुंतवणूक केली, परंतु त्यातून अनेक फायदे मिळाले,



असेही पंतप्रधान मोदी म्हणाले.

विस्तारित मालवाहतूक नेटवर्कमुळे कृषी क्षेत्रालाही मोठा फायदा होणार आहे. पूर्व व पश्चिम भारतातील शेतकऱ्यांना नाशवंत कृषी उत्पादने मोठ्या बाजारपेठांमध्ये वेगाने पोहचवणे आता शक्य होत आहे. हंगामी फुले, भाजीपाला फळे वेळेवर ग्राहकांपर्यंत तसेच मंडईपर्यंत पोहचत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा फायदा होत असल्याचे त्यांनी सांगितले.

रस्ते, मेट्रो, विमानतळ आणि गॅस पाईपलाईन यांसारख्या पायाभूत सुविधांच्या विकासामुळे होणाऱ्या व्यापक आर्थिक परिणामांचा उल्लेख करताना पंतप्रधानांनी दोन कोटी ७५ लाख कोटींपेक्षा अधिक असलेल्या ऐतिहासिक रेल्वे अर्थसंकल्पाचा उल्लेख केला. पायाभूत सुविधांवरील खर्चामुळे मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण होत असल्याचे त्यांनी सांगितले. गरिबांसाठी घरे बांधणे, बंदरांचा विस्तार करणे यामुळे आसपासच्या परिसरात नवीन उद्योग आणि व्यवसाय विकसित होतात. रेल्वेच्या आधुनिकीकरणावर होणारा खर्च मोठ्या प्रमाणात नवीन रोजगार निर्माण करत असल्याचेही त्यांनी सांगितले.

गेल्या दशकातील भारताच्या वाढत्या औद्योगिक क्षमतेचा उल्लेख करताना ते म्हणाले, सन २०१४पासून भारताने ५० हजार आधुनिक रेल्वे डबे तयार केले असून जवळपास दोन लाख पाच हजार वॅगन रेल्वे नेटवर्कमध्ये समाविष्ट केल्या आहेत. भारत हा रेल्वे डबे, मेट्रो डबे आणि रेल्वे इंजिनचा प्रमुख उत्पादक देश बनला असल्याचेही ते यावेळी म्हणाले. **(पान २ वर..)**

### रोजगार निर्मितीला चालना -मुख्यमंत्री

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, जेएनपीटीला देशाच्या विस्तीर्ण भूभागाशी जोडणारी पश्चिम समर्पित मालवाहतूक मार्गिका कार्यान्वित झाल्यामुळे महाराष्ट्राच्या लॉजिस्टिक क्षमतेला आणि रोजगार निर्मितीला मोठी चालना मिळणार आहे. देशातील सुमारे ५५ टक्के कंटेनर वाहतूक हाताळणाऱ्या जेएनपीटीच्या माध्यमातून होणाऱ्या मालवाहतुकीत या मार्गिकेमुळे मोठी वाढ होईल. एप्रिल ते ऑगस्टदरम्यान जेएनपीटीने सुमारे ३८.२७ लाख टीईयू कंटेनर हाताळले असून समर्पित मालवाहतूक मार्गिका पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यानंतर या वाहतुकीला आणखी गती मिळेल, असे सांगून येत्या २०३०पर्यंत जेएनपीटी हे देशातील दशलक्ष टीईयूपेक्षा अधिक क्षमता असलेले पहिले बंदर ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## निवडक

### राहुल गांधींना धक्का! ‘तो’ खटला रद्द करण्यास हायकोर्टाचा नकार

**मुंबई :** काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरोधात केलेल्या ‘चौकीदार चोर है’ या टिप्पणीबाबत दाखल झालेला मानहानीचा फौजदारी खटला रद्द करण्यास उच्च न्यायालयाने नकार दिला आहे. याप्रकरणी राहुल गांधी यांनी दंडाधिकाऱ्यांच्या कोर्टाकडून बजावण्यात आलेल्या समन्सला मुंबई हायकोर्टात आव्हान दिले होते. या प्रकरणाची सुनावणी करताना न्यायमूर्ती नितीन बोरकर यांच्या एकसदस्यीय खंडपीठाने राहुल यांचा युक्तिवाद फेटाळून लावला आहे.

### वंचित २५ हजार झोपडीधारकांना अभय योजनेचा मिळणार लाभ

**मुंबई :** परिशिष्ट–२नंतर अपात्र झोपडीचे हस्तांतरण झाल्यामुळे अभय योजनेच्या लाभापासून वंचित राहिलेल्या २००० पूर्वीच्या तसेच २००० ते २०११ दरम्यानच्या झोपडीधारकांनाही अभय योजनेचा लाभ देण्यासाठी योजनेचा विस्तार करण्यात येणार आहे. याबाबतचे निर्देश मुंबई उपनगरचे पालकमंत्री अ‍ॅड. आशिष शेलार यांनी दिलेत.

## खेळाडूंच्या नोकरीतील पाच टक्के आरक्षणाचे सुधारित धोरण मंजूर

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य मंत्रिमंडळाच्या मंगळवारी (दि. ८) झालेल्या बैठकीत खेळाडूंच्या शासकीय, निमशासकीय तसेच इतर क्षेत्रातील नोकरीसाठीच्या पाच टक्के आरक्षणाबाबत सुधारित धोरणाला मंजुरी देण्यात आली. या निर्णयामुळे यशस्वी खेळाडूंना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठीच्या आरक्षण धोरणात बदल करण्यात आला असून यापूर्वीचे सर्व शासन निर्णय, शुद्धिपत्रके, परिपत्रके आणि पत्रे रद्द करण्यात आली आहेत.

दरम्यान, राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी ‘प्रगती’ हा प्रकल्प राबविण्यासही मान्यता देण्यात आली. २०२६ ते २०३१ या कालावधीत हा प्रकल्प राबविला जाणार असून त्यासाठी आशियाई विकास बँकेकडून कर्ज घेण्यास आणि त्यामध्ये राज्य शासनाचा हिस्सा समाविष्ट करण्यास मंजुरी देण्यात आली.

वस्त्रोद्योग क्षेत्रात ह्योसंग इंडिया प्रा. लि. यांना भांडवली अनुदान देण्याचा निर्णयही मंत्रिमंडळाने घेतला तसेच सोलापूर जिल्ह्यातील माढा येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय



स्थापन करण्यास मंजुरी देण्यात आली. या न्यायालयासाठी आवश्यक पदनिर्मिती आणि खर्चाच्या तरतुदीलाही मान्यता देण्यात आली.

महसूल विभागाशी संबंधित काही महत्त्वाचे निर्णयही घेण्यात आले. मुंबईतील कैवल्यधाम ईश्वरदास चुन्नीलाल योगिक सेंटरच्या भाडेपट्ट्याचे सवलतीच्या दरात नूतनीकरण करण्यास मंजुरी देण्यात आली तसेच चेंबूर येथील भिक्खू संघ युनायटेड बुद्धिस्ट मिशन संस्थेला त्यांच्या वहिवाटीतील जमीन देण्यास मान्यता देण्यात आली.

नागपूरमधील कोराडी येथील तीर्थक्षेत्र विकास आराखड्यात विकसित करण्यात येत असलेल्या शासकीय जमिनी श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थानाला देण्यासही मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे.

## ट्रक-पिकअप अपघातात सहा जण मृत्युमुखी

**गोंदिया : प्रतिनिधी**

रोजगाराच्या शोधात तेलंगणाकडे निघालेल्या मजुरांचा पिकअप आणि ट्रक यांची समोरासमोर धडक होऊन सहा जणांचा मृत्यू, तर सात जण गंभीर जखमी झाले आहेत. गोंदिया–बालाघाट मार्गावरील नागरा–मोहरानटोली परिसरात सोमवारी मध्यरात्रीनंतर हा भीषण अपघात झाला.

गोंदियाकडून येणाऱ्या भरधाव ट्रकची कामगारांना घेऊन जाणाऱ्या पिकअपला जोरदार धडक बसली. या अपघातात आरुष मात्रे (३), किरण संतोष वैद्य (२६), संतोष मात्रे (३८), सुशिला मात्रे (३५), रुपसेन सत्यकर (३५) आणि ज्योती सत्यकर (३२) यांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. सर्व मृतक मध्य प्रदेशातील बालाघाट जिल्ह्यातील विविध भागांतील रहिवासी असल्याचे सांगण्यात आले.

भुमेश्वर मात्रे, संगीता मात्रे, राजेंद्र पंचाले, लक्ष्मी पंचाल, संतोष वैद्य, राकेश बाहे आणि चालक संदीप बाहे हे जखमी झाले असून त्यांच्यावर गोंदिया येथील केटीएस जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत. जखमींपैकी काहींची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे.

## बोगस पीएमओ अधिकाऱ्यासह बंदूकधारी बॉडीगार्ड ताब्यात

**मुंबई : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मुंबई दौऱ्यादरम्यान सुरक्षा व्यवस्थेत घुसखोरी करण्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. वांद्रे–कुर्ला संकुल येथील नीता मुकेश अंबानी कल्चरल सेंटर येथे आयोजित कार्यक्रमाच्या ठिकाणाहून संशयास्पदरित्या फिरणाऱ्या दोघांना मुंबई पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या घटनेमुळे मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार रोहन पारेख (२४) असे ताब्यात घेण्यात आलेल्या मुख्य संशयिताचे नाव आहे. तो स्वतःला पंतप्रधान कार्यालयाचा (पीएमओ) वरिष्ठ अधिकारी असल्याचे भासवत कार्यक्रमाच्या मुख्य परिसरात प्रवेश करण्याचा प्रयत्न करीत होता. यावेळी रोहन याने स्वतःचे पीएमओ कार्यालयाचे ओळखपत्र दाखवले, मात्र सुरक्षा यंत्रणांना त्याच्या हालचालींवर आणि ओळखपत्रावर संशय आल्याने त्यांनी कसून तपासणी केली असता ते ओळखपत्र बनावट असल्याचे निष्पन्न झाले.

विशेष म्हणजे रोहन पारेख याच्यासोबत एक खासगी बॉडीगार्डदेखील होता. पोलिसांनी त्यालाही रोखून त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे एक बंदूक आढळल्याची माहिती समोर आली आहे. सुरक्षेत गंभीर बिघाड निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या या दोघांनाही पोलिसांनी तत्काळ ताब्यात घेतले. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता या संपूर्ण प्रकरणाचा पुढील तपास आता मुंबई क्राईम ब्रँचकडे सोपवण्यात आला आहे.

## सजावटीच्या साहित्याने बाजारपेठ फुलली

**अलिबाग : प्रतिनिधी**

गणरायाच्या आगमनाची चाहूल लागताच रायगड जिल्ह्यातील बाजारपेठा सजावटीच्या साहित्याने फुलल्या आहेत. घरगुती गणपतीपासून सार्वजनिक मंडळांच्या गणेशोत्सवापर्यंत सजावटीसाठी लागणाऱ्या विविध वस्तूंनी दुकाने सजली असून गणेशभक्तांची खरेदीसाठी गर्दी वाढू लागली आहे.

यंदा पारंपरिक सजावटीसोबतच आकर्षक लायटिंग, आर्टिफिशियल फुले, रेडिमेड बॅकड्रॉप, तोरणे, पडदे, मोत्यांच्या माळा, कागदी व पर्यावरणपूरक सजावट तसेच विविध थीमवर आधारित सजावटीच्या वस्तूंना विशेष मागणी असल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात येत आहे.

गणेशोत्सव हा रायगडच्या ग्रामीण जीवनाचा अविभाज्य भाग आहे. त्यामुळे अलिबाग, पेण,

### नव्या आकर्षक वस्तूंना गणेशभक्तांची पसंती



पनवेल, रोहा, माणगाव, महाड, पोलादपूर, श्रीवर्धन, म्हसळा, मुरूड यांसह जिल्ह्यातील ग्रामीण भागातील बाजारपेठांमध्येही सजावटीच्या साहित्याची मोठी उलाढाल सुरू झाली आहे. शहरातील मोठ्या दुकानांबरोबरच गावागावातील छोट्या दुकानदारांनीही गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर विविध प्रकारचे सजावटीचे साहित्य उपलब्ध करून दिले आहे.

यंदा ग्राहकांचा कल केवळ पारंपरिक झेंडूची फुले आणि कागदी मखरांपुरता मर्यादित राहिलेला नाही. कमी वेळेत घर आकर्षक पद्धतीने सजवता यावे यासाठी रेडिमेड सजावटीच्या वस्तूंना पसंती मिळत आहे. विविध रंगांच्या एलईडी लाईट्स, पडदे, फुलांच्या माळा, वॉल हँगिंग, मोत्यांच्या माळा, कृत्रिम वेली, गणेशाची आकर्षक पार्श्वभूमी आणि तयार मखर यांची मागणी वाढली आहे.

रायगडच्या ग्रामीण भागात मात्र पारंपरिक सजावटीला अजूनही मोठे महत्त्व आहे. घरच्या घरी मखर तयार करणे, कागद, बांबू, कापड आणि नैसर्गिक वस्तूंचा वापर करून सजावट करणे, फुलांची आरास करणे याकडे अनेक कुटुंबांचा कल आहे, मात्र वेळेअभावी आणि सजावटीतील नवनवीन प्रयोगांमुळे रेडिमेड साहित्याची मागणीही ग्रामीण बाजारपेठेत वाढली आहे.

गणेशोत्सवामुळे सजावटीच्या साहित्य विक्रेत्यांबरोबरच फुलविक्रेते, कापड विक्रेते, इलेक्ट्रिकल दुकानदार, हस्तकला साहित्य विक्रेते आणि लहान व्यावसायिकांनाही रोजगाराची संधी मिळत आहे. गणेशोत्सवाच्या काही दिवसांमध्ये या साहित्याची विक्री वाढत असल्याने छोट्या व्यावसायिकांसाठी हा महत्त्वाचा हंगाम ठरतो.

यंदा प्लास्टिकचा वापर टाळून कागद, कापड, बांबू, नारळाच्या करवंट्या, लाकूड व इतर नैसर्गिक साहित्यापासून तयार केलेल्या वस्तू बाजारात दिसत आहेत. पर्यावरणपूरक सजावटीच्या साहित्याला काही ग्राहकांकडून पसंती मिळत आहे.

### थीमवर आधारित संकल्पनांवर भर

विशेष म्हणजे यंदा थीमवर आधारित घरगुती सजावटीकडे ग्राहकांचा कल वाढताना दिसत आहे. कोकणी संस्कृती, वारली कला, ग्रामीण जीवन, मंदिराची प्रतिकृती, फुलांची आरास अशा वेगवेगळ्या संकल्पनांवर आधारित सजावटीचे साहित्य बाजारात उपलब्ध झाले आहे. त्यामुळे कमी जागेतही आकर्षक सजावट करण्याचा प्रयत्न गणेशभक्तांकडून केला जात आहे.

## गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पनवेल मनपा हद्दीतील रस्ते दुरुस्तीचा आढावा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते सुस्थितीत व सुरक्षित राहावेत यासाठी दुरुस्तीची कामे मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात आली आहेत. या कामांचा महापालिका बांधकाम विभाग आणि कॉन्ट्रॅक्टर यांच्याकडून आढावा घेण्यात आला.

या बैठकीला महापौर नितीन पाटील, अतिरिक्त आयुक्त गणेश शेट्ये, सभागृहनेते अ‍ॅड. प्रकाश बिनेदार, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर, प्रभाग समिती ‘ड’चे सभापती अजय बहिरा, नगरसेवक सुमित झुंजारराव, प्रभारी शहर अभियंता राजेश कर्डिले, प्रितम पाटील, अभियंता, कंत्राटदार उपस्थित होते. नागरिकांना ये–जा करणे सुकर होण्यासाठी वेगाने कामे करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

# पावसाअभावी करपलेल्या पिकांचे तातडीने पंचनामे करा -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याच्या काही भागात पावसाने मोठा खंड दिल्याने शेतातील उभी पिके करपण्याच्या मार्गावर असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने दखल घेत पावसाचा खंड पडलेल्या विभागांतील पिकांचे सर्वेक्षण करून पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत. मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भातील कमी पावसाच्या भागात पिकांची प्रत्यक्ष पाहणी करून शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याच्या सूचना मुख्य सचिवांना देण्यात आल्या आहेत.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील पर्जन्यमान आणि पीकस्थितीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. बैठकीनंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पत्रकारांना माहिती दिली. विदर्भात सुमारे ३५ टक्के पावसाची तूट आहे, तर मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातही पाऊस सरासरीपेक्षा कमी आहे. दीर्घ खंडामुळे पिकांसह पाणीटंचाईचे संकटही निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर पिके वाचविण्यासाठी शेतकऱ्यांना दिवसाला १२ तास वीजपुरवठा करण्याचे आणि जळालेले रोहित्र तातडीने बदलून वीजपुरवठा सुरळीत करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.



उपलब्ध जलसाठ्यांचा काटकसरीने वापर करावा आणि सिंचनाचे योग्य नियोजन करावे, अशाही सूचना जलसंपदा विभागाला देण्यात आल्या आहेत. ज्या भागात पिके वाचवणे शक्य होणार नाही, तेथे सर्वेक्षण आणि पंचनाम्यांच्या आधारे नुकसानभरपाई देण्यात येईल, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले. पुढील आठवड्यात पावसाची शक्यता कमी असल्याने परभणी, बीड, हिंगोलीसह मराठवाड्यासाठी विशेष पॅकेज जाहीर होणार का, याबाबत विचारले असता सध्या पंचनामे प्राधान्याचे असून पावसाची तूट कायम राहिल्यास सरकारकडून विशेष उपाययोजना करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

दरम्यान, गणेशोत्सव आणि आगामी सण शांततेत पार पाडण्यासाठी कायदा-सुव्यवस्था राखण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत. साखर कारखान्यांचा गाळप हंगाम लवकर सुरू करण्याच्या निर्णयावरून होत असलेल्या विरोधावर सरकारची भूमिका योग्य असून लवकर गाळप सुरू झाल्यास शेतकऱ्यांचाच फायदा होईल, असेही बावनकुळे यांनी नमूद केले.

# खांदा कॉलनीत चोरट्यांचा धुमाकूळ

## ५.४१ लाखांचे दागिने लंपास

**पनवेल : वार्ताहर**

खांदा कॉलनीतील सेक्टर ७ मधील शिवछत्र रो हाऊस येथे बंद घराच्या दरवाजाचा कडी-कोयंडा तोडून अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश करत कपाटातील सोन्या-चांदीचे दागिने आणि रोकड असा तब्बल पाच लाख ४१ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.



याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार विठ्ठल राजाराम पराते (६७) हे शिवछत्र रो हाऊस येथे राहतात. ३१ ऑगस्ट रोजी सकाळी ११.२५ वाजल्यापासून ७ सप्टेंबर रोजी पहाटे ५.३० वाजेपर्यंतच्या कालावधीत अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या बंद घराच्या दरवाजाचा कडी-कोयंडा तोडून आत प्रवेश केला. चोरट्यांनी घरातील कपाट फोडून सोन्याचे मंगळसूत्र, बांगड्या, पुरुषांची अंगठी, महिलांच्या अंगठ्या, कानातील दागिने तसेच पेंडल असलेली सोन्याची चेन असा ऐवज लंपास केला. याशिवाय देवाचे चित्र असलेली चांदीची नाणी, चांदीच्या पैंजण, चांदीचा पेला आणि १५०० रुपये रोख असा मुद्देमालही चोरीस गेला.

घटनेची माहिती मिळताच खांदेश्वर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. पनवेल विभागाचे सहायक पोलीस आयुक्त मयूर भुजबळ, वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता ढाकणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) सचिन परदेशी, सहायक पोलीस निरीक्षक उत्तम घेगडमल आणि सहायक पोलीस निरीक्षक विनोद परदेशी यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

# बेशिस्त रिक्षाचालकांवर कारवाईचा बडगा

## पाच दिवसांत १३२० कारवाया; साडेनऊ लाखांचा दंड वसूल

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील बेशिस्त रिक्षाचालक आणि वाहतूक नियम धाब्यावर बसवणाऱ्या वाहनचालकांविरोधात वाहतूक पोलिसांनी धडक मोहीम उघडली असून पनवेल शहर वाहतूक शाखेच्या वतीने विशेष मोहीम राबविण्यात आली. ४ ते ८ सप्टेंबरदरम्यान राबविण्यात आलेल्या या मोहिमेत वाहतूक शाखेकडून तब्बल १३२० कारवाया करण्यात आल्या असून त्यातून नऊ लाख ५० हजार २५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.



याशिवाय प्रादेशिक परिवहन विभागाच्या (आरटीओ) वतीने ४२ कारवाया करण्यात आल्या असून या कारवाईत तीन लाख ८४ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला. पनवेल शहरातील रिक्षाचालकांकडून होणाऱ्या वाहतूक नियमांच्या उल्लंघनाला आळा घालण्यासाठी ८ सप्टेंबर रोजी सकाळी ७ ते ११.३० या वेळेत पनवेल शहर वाहतूक शाखा आणि आरटीओच्या वतीने संयुक्त विशेष मोहीम राबविण्यात आली. नवीन पनवेल रेल्वे स्टेशन, एचडीएफसी तसेच आदई सर्कल, माथेरान रोड परिसरात ही कारवाई करण्यात आली.

पोलीस निरीक्षक सुभाष पुजारी व सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक अनिल गेळे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या कारवाईत रिक्षामध्ये अनधिकृतपणे फ्रंट सीट बसविणे, गणवेश नसणे, मीटरप्रमाणे भाडे न आकारणे, काळ्या काचा, विनाहेल्मेट वाहन तसेच इतर वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. या मोहिमेत पनवेल शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक सुभाष पुजारी व अधिकारी, अंमलदार तसेच आरटीओचे अधिकारी सहभागी झाले होते.

# जवान बेपत्ता

**पनवेल : खारघर**

खारघर से. ३८ येथील रॅपिड ॲक्शन फोर्सच्या (आरएएफ) कॅम्पमधून एक जवान कोणालाही काहीही न सांगता अचानक बेपत्ता झाल्याची घटना समोर आली असून याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून त्याचा शोध घेण्यात येत आहे. शिपाई जनरल ड्युटी अमोल रमेशराव खाडे (३४) असे बेपत्ता जवानाचे नाव आहे. त्यांना अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेले असावे, अशी शक्यता आरएएफमधील उपनिरीक्षक राधेश्याम मालवीय यांनी व्यक्त केली असून याबाबत खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

# कसळखंडमध्ये बोगस डॉक्टरचा पर्दाफाश

## आरोग्य विभागाची धडक कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील कसळखंड गावात कोणतीही वैद्यकीय पात्रता नसताना दवाखाना थाटून रुग्णांवर उपचार करणाऱ्या तरुणाचा प्रकार आरोग्य विभागाच्या कारवाईत उघडकीस आला. नुरूल हुडा इमामुल हक (२७) याला पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याच्याविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


कसळखंडमध्ये नुरूल याने सुमारे दीड महिन्यापूर्वी दवाखाना सुरू केला होता. परिसरातील काही ग्रामस्थांना त्याच्या वैद्यकीय पात्रतेबाबत संशय आल्याने त्यांनी याबाबत आजिवली प्राथमिक आरोग्य केंद्रातील अधिकाऱ्यांकडे माहिती दिली. त्यानंतर आरोग्य विभागाने पोलिसांच्या मदतीने संबंधित दवाखान्याची पाहणी करण्याचा निर्णय घेतला. सोमवारी दुपारी सव्वादोनच्या सुमारास वैद्यकीय अधिकाऱ्यांचे पथक आणि पोलीस दवाखान्यात दाखल झाले. तपासणीदरम्यान नुरूल याच्याकडे डॉक्टर म्हणून उपचार करण्यासाठी आवश्यक असलेली कोणतीही वैद्यकीय पदवी नसल्याचे स्पष्ट झाले. विशेष म्हणजे दवाखान्यात विविध औषधांचा साठाही आढळून आला.

ग्रामस्थांकडून मिळालेल्या माहितीची दखल घेत पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंदा हारुगडे यांना चौकशीचे आदेश दिले होते. त्यानुसार ही कारवाई करण्यात आली. याप्रकरणी नुरूलविरुद्ध महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसाय अधिनियम, १९६१ मधील कलम ३३(१) व ३३(२) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# लाटांशी झुंज देत विदीची ऐतिहासिक कामगिरी

## ८१ किमीचा जलतरण प्रवास केला पूर्ण

**नवी मुंबई : बातमीदार**



अवघ्या १३व्या वर्षी विदी भोरने जिद्द, चिकाटी व कठोर परिश्रमाच्या जोरावर जलतरण क्षेत्रात ऐतिहासिक कामगिरी केली. फादर अँग्नेल हायस्कूल, वाशी येथे आठवीत शिकणाऱ्या विदीने प. बंगालमधील अहिरण घाट ते गोरा बाजार, मुर्शिदाबाद हा तब्बल ८१ किमीचा नदी जलतरण प्रवास ११ तास ५९ मिनिटांत पूर्ण केला आहे.

स्विमिंग फेडरेशन ऑफ इंडियाच्या संलग्नतेखाली झालेल्या स्पर्धेत मुलींच्या गटात तिने द्वितीय क्रमांक पटकावला. हा प्रवास पूर्ण करणारी ती कमी वयाची मुलगी ठरली. विदीने प्रत्येक स्ट्रोकसोबत आपली जिद्द कायम ठेवत ११ तास ५९ मिनिटांत प्रवास पूर्ण केला.

# परस्परविरोधी दाव्यांमुळे कॅब विनयभंग प्रकरणात गोंधळ

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळील निर्मळगिरी सर्व्हिस रोडवर कॅब थांबवून २३ वर्षीय तरुणीशी गैरवर्तन करून विनयभंग करण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपावरून कॅबचालकाला नवी मुंबई विमानतळ पोलिसांनी अटक केली असून कॅबचालकाने मात्र तरुणीचे सर्व आरोप फेटाळून लावत तरुणी आणि तिच्या प्रियकरामधील वादात आपल्याला विनाकारण गोवण्यात आल्याचा दावा केला आहे.

पनवेलमधील साईनगर येथे राहणारी संबंधित तरुणी ५ सप्टेंबर रोजी रात्री मैत्रिणींसोबत चेंबूर येथे पार्टीसाठी गेली होती. पार्टी संपल्यानंतर घरी जाण्यासाठी तिच्या मैत्रिणीने कॅब बुक केली होती. कॅबचालक मोहम्मद अफजल शेख हा तिला पनवेल येथे सोडण्यासाठी निघाला. मध्यरात्री १.३० वाजण्याच्या सुमारास कॅब निर्मळगिरी परिसरातील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळील सर्व्हिस रोडवर पोहोचली. परिसर निर्मनुष्य असल्याचा फायदा घेत चालकाने कॅब रस्त्याच्या कडेला थांबविल्याचा आरोप तरुणीने केला आहे.



(संग्रहित छायाचित्र)

पाणी पिण्याच्या बहाण्याने चालक कॅबमधून बाहेर गेला. त्यानंतर पुन्हा कॅबमध्ये येऊन तो मागील सीटवर तरुणीच्या शेजारी बसला आणि तिच्याशी गैरवर्तन करण्यास सुरुवात केल्याचा आरोप तिने केला.

तरुणीने त्याला तीव्र विरोध करीत आरडाओरड केल्यानंतर चालक घटनास्थळावरून पसार झाल्याचे तिचे म्हणणे आहे. या घटनेनंतर तरुणीने प्रथम पनवेल शहर पोलीस ठाण्यात आणि त्यानंतर विमानतळ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीनुसार विमानतळ पोलिसांनी गुन्हा दाखल करून तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे काही तासांतच कॅबचालक मोहम्मद अफजल शेखला अटक केली. दरम्यान, अटक करण्यात आलेल्या चालकाने तरुणीचे आरोप फेटाळून लावले आहेत.

तरुणी आणि तिच्या प्रियकरामध्ये झालेल्या वादात आपल्याला विनाकारण गोवण्यात आल्याचे त्याचे म्हणणे आहे. तसेच आपण तरुणीला तिच्या घरी सुखरूप सोडल्याचा दावा त्याने पोलिसांना दिलेल्या जबाबात केला आहे. त्यामुळे या प्रकरणात तरुणीचे आरोप आणि कॅबचालकाचा दावा असे परस्परविरोधी दावे समोर आले आहेत. दरम्यान, पोलिसांकडून उपलब्ध पुरावे, तांत्रिक माहिती आणि घटनाक्रमाच्या आधारे पुढील तपास करण्यात येत असून नेमकी वस्तुस्थिती तपासाअंतीच स्पष्ट होणार आहे.


# अटल सेतूवरून विघ्नहर्ताची दिमाखदार स्वारी; व्हिडीओ व्हायरल

**पनवेल : वार्ताहर**

अटल सेतूचा प्रवास करत ढोल-ताशांचा गजर, लेझीमचा ठेका, पारंपरिक वाद्यांचा निनाद आणि हजारो गणेशभक्तांचा उत्स्फूर्त सहभाग अशा भक्तिमय वातावरणात नवी मुंबईचा आगमनाधीश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कामोठ्याच्या विघ्नहर्ताचा भव्य महाआगमन सोहळा मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडला. अटल सेतूवरून विघ्नहर्ताची भव्य मिरवणूक कामोठ्याच्या दिशेने दाखल होताच परिसरातील वातावरण भक्तिमय झाले.

गणरायाच्या दर्शनासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया, अशा जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. कामोठ्याचा विघ्नहर्ता सार्वजनिक उत्सव मंडळाच्या वतीने आयोजित महाआगमन सोहळ्यात ढोल-ताशा पथके, लेझीम पथक, पारंपरिक वेशभूषा तसेच विविध आकर्षक देखाव्यांनी सोहळ्याची रंगत वाढवली. गणेशभक्तांच्या उत्साहाला उधाण आले होते.

लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी भव्य आगमन सोहळ्याचा मनमुराद आनंद घेतला. अटल सेतू ते कामोठे असा विघ्नहर्ताचा दिमाखदार प्रवास केवळ गणेशमूर्तीचे आगमन न ठरता कामोठेकरांची श्रद्धा, एकजूट आणि गणेशभक्तीचे भव्य दर्शन घडविणारा ठरला. मार्गावर ठिकठिकाणी गणेशभक्तांनी विघ्नहर्ताचे उत्स्फूर्त स्वागत केले.



# आरटीओ अधिकाऱ्यावर प्राणघातक हल्ला; सोनसाखळीही लुटली

**नवी मुंबई : बातमीदार**

मीटरप्रमाणे भाडे नाकारून मनमानी भाडे उकळणाऱ्या रिक्षाचालकांची मुजोरी आता थेट सरकारी अधिकाऱ्यांच्या अंगावर धावून जाण्यापर्यंत पोहोचली असून नेरूळ येथील एल. पी. ब्रिजजवळ मीटरने येण्यास सांगणाऱ्या नवी मुंबई आरटीओ कार्यालयातील सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक तुषार तानाजी कदम (३३) यांच्यावर पाच ते सहा रिक्षाचालकांच्या टोळक्याने जीवघेणा हल्ला चढवला. या मारहाणीत कदम यांच्या डाव्या डोळ्याला, तोंडावर आणि शरीरावर गंभीर दुखापत झाली असून हल्लेखोरांनी त्यांच्या गळ्यातील सोन्याची साखळीदेखील पळवून नेल्याची धक्कादायक घटना घडली आहे.

सोमवारी सकाळी ५.४५च्या सुमारास तुषार कदम आपल्या मूळ गावाहून ट्रॅव्हल्सने नेरूळ एल. पी. ब्रिजजवळ उतरले. तेथून उलवे येथील घरी जाण्यासाठी त्यांनी रिक्षा (क्रमांक एमएच-४३-सीए-७३३७) अडवली. रिक्षाचालकाने मीटरने येण्यास स्पष्ट नकार देऊन थेट ३०० रुपये भाड्याची मागणी केली. कदम यांनी आरटीओचे ओळखपत्र दाखवून मीटरने चालण्याचे आवाहन केले असता रिक्षाचालक चिडला आणि त्याने तू आरटीओ अधिकारी असशील तर तुझ्याजवळ ठेव, आमची युनियन आहे, असे म्हणत वाद घालण्यास सुरुवात केली. रिक्षाचालकाने आपल्या साथीदारांना घटनास्थळी बोलावून घेतले. टोळक्याने कदम यांना मारहाण केली. या झटापटीत कदम यांच्या गळ्यातील सोन्याची साखळी गहाळ झाली.

घटनेनंतर कदम यांनी सहकाऱ्यांच्या मदतीने नेरूळ पोलीस ठाणे गाठले. पोलिसांनी त्यांना उपचारासाठी नवी मुंबई महापालिकेच्या वाशी रुग्णालयात दाखल केले असून याप्रकरणी नेरूळ पोलीस ठाण्यात आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**पान १ वरुन**

# देशाच्या लॉजिस्टिक व्यवस्थेला नवी गती -पंतप्रधान मोदी

डेटा सेंटर आणि कृत्रिम बुद्धिमत्तासारख्या उदयोन्मुख तंत्रज्ञानासाठी मजबूत वीज व्यवस्था आवश्यक असल्याचे अधोरेखित करताना पंतप्रधानांनी सांगितले की, युरेनियम, महत्त्वाची खनिजे आणि दुर्मिळ पृथ्वी मूलद्रव्ये यासाठी आंतरराष्ट्रीय करार केले जात आहेत. भारताला कृत्रिम बुद्धीमत्ता क्षेत्रातील जागतिक महासत्ता बनवायचे असल्यास आवश्यक पायाभूत सुविधा उभारणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता हे केवळ माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रापुरते मर्यादित नसून भविष्यातील मूलभूत क्षमता आहे.

शेती, आरोग्यसेवा आणि रोबोटिक्स यांसारख्या क्षेत्रांमध्ये नवकल्पना घडवून आणण्यासाठी कुशल युवकांची मोठी फळी तयार करण्याकरिता राष्ट्रीय स्तरावर व्यापक अभियान राबविण्याची घोषणा करत अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञान आत्मसात केल्याने उत्पादनक्षमता वाढेल आणि नाविन्यपूर्ण स्टार्टअप्सना चालना मिळेल, असे पंतप्रधानांनी म्हटले.

यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना राज्यपाल जिष्णू देव वर्मा म्हणाले, पूर्व समर्पित मालवाहतूक मार्गिका यापूर्वीच कार्यान्वित झाली असून पश्चिम समर्पित मालवाहतूक मार्गिकेच्या पूर्णत्वामुळे देशातील संपूर्ण समर्पित मालवाहतूक मार्गिका नेटवर्क आता पूर्ण झाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली देशाच्या वाहतूक व लॉजिस्टिक्स पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणाच्या दृष्टीने ही अत्यंत महत्त्वाची आणि ऐतिहासिक उपलब्धी आहे. मालवाहतुकीसाठी स्वतंत्र मार्गिका उपलब्ध झाल्यामुळे विद्यमान रेल्वे मार्गावरील प्रवासी रेल्वेगाड्यांना अधिक वेगाने आणि वेळेत धावण्यास मदत होणार असल्याचे ते म्हणाले.

समर्पित मालवाहतूक मार्गिकेमुळे रस्ते वाहतुकीऐवजी रेल्वे वाहतुकीकडे मालवाहतुकीचा कल वाढेल, रस्त्यांवरील वाहतूक कोंडी कमी होईल, लॉजिस्टिक्सचा खर्च घटेल आणि देशातील पुरवठा साखळी अधिक कार्यक्षम होण्यास मदत मिळेल. रायगड, ठाणे आणि पालघर या तीन जिल्ह्यांतून सुमारे १७८ मार्ग किलोमीटर लांबीची ही मार्गिका जात असून महाराष्ट्रातील प्रकल्पाच्या भागासाठी जमिनीच्या खर्चासह १० हजार कोटींपेक्षा अधिक गुंतवणूक करण्यात आली आहे. या महत्त्वपूर्ण प्रकल्पामुळे विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वासही राज्यपालांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, दादरी, (उत्तर प्रदेश) ते जेएनपीटी (महाराष्ट्र) या पश्चिम समर्पित मालवाहतूक मार्गिकेतील जेएनपीटी ते न्यू उमरगाव हा अत्यंत महत्त्वाचा भाग आज कार्यान्वित होत आहे. सुमारे एक हजार ५०० किमी लांबीची ही मार्गिका उत्तर भारताला पश्चिम भारताशी जोडत असून पश्चिम किनारपट्टीवरील जेएनपीटीसारख्या महत्त्वाच्या बंदराचा लॉजिस्टिक्सचा लाभ देशाच्या मोठ्या भूभागाला मिळणार आहे. महाराष्ट्रातील या मार्गासाठी सुमारे १० हजार कोटींची गुंतवणूक असून १७८ किमी लांबीचा मार्ग राज्यातून जात असल्याची माहितीही त्यांनी दिली.

जागतिक पुरवठा साखळीचा महत्त्वाचा भाग बनण्यासाठी देशातील लॉजिस्टिक्स खर्च कमी करणे आवश्यक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशातील लॉजिस्टिक्स खर्चात घट झाली असून समर्पित मालवाहतूक मार्गिका पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यानंतर तो आणखी कमी होईल. त्यामुळे भारताची जागतिक स्पर्धात्मकता वाढून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मितीला चालना मिळेल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले, जेएनपीटीच्या विस्तारासोबतच वाढवण बंदर विकसित होत असून त्यामुळे महाराष्ट्राची सागरी क्षमता आणखी वाढणार आहे. जेएनपीटी आणि वाढवणसारख्या बंदरांना सक्षम रेल्वे मालवाहतूक जोडणी मिळाल्याने महाराष्ट्राला देशातील महत्त्वाचे मॅरिटाईम पॉवर आणि जागतिक लॉजिस्टिक्स केंद्र म्हणून विकसित करण्यास मदत होईल.

डीएफसीसीआयएलचे व्यवस्थापकीय संचालक प्रवीण कुमार यांनी पश्चिम समर्पित मालवाहतूक मार्गिकेच्या प्रकल्पाची वैशिष्ट्ये, बांधकामादरम्यान आलेली अभियांत्रिकी आव्हाने, मार्गिकेची क्षमता तसेच जेएनपीटीशी जोडणीमुळे मालवाहतुकीला मिळणारी गती याबाबत माहिती दिली, तर जपानच्या मुंबईस्थित वाणिज्य दूतावासाच्या महावाणिज्यदूत सातो हितोमी यांनी प्रकल्पाच्या उभारणीत भारत-जपान सहकार्याचे महत्त्व अधोरेखित केले. प्रारंभी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्वागत आमदार प्रशांत ठाकूर, ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा.लि.चे डायरेक्टर माताप्रसाद त्यागी, अमोघ ठाकूर यांनी केले.

**दुखवटा**

## शितलप्रसाद गुप्ता



**कर्जत** : येथील शहरातील बाजारपेठेत राहणारे शितलप्रसाद शिवनारायण गुप्ता यांचे अल्पशा आजाराने ७७व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन कन्या, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## किटकजन्य आजार रोखण्यासाठी
# पनवेल महानगरपालिका सज्ज
## विशेष धूर फवारणी मोहीम, सर्वेक्षण आणि जनजागृती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सध्याचे वातावरण डासांच्या उत्पत्तीस पोषक झाल्याने डेंग्यू, मलेरिया यांसह किटकजन्य आजारांचा धोका वाढला आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पनवेल महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून व्यापक विशेष धूर फवारणी मोहीम व सर्वेक्षण मोहीम राबविण्यात येत आहे.

डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी नागरिकांनीही सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे. ऑगस्ट महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून पावसाचे प्रमाण कमी झाले असून डास उत्पत्तीचे प्रमाण वाढू लागल्याने किटकजन्य आजारांत वाढ होऊ शकते. या पार्श्वभूमीवर महापालिका कार्यक्षेत्रातील आरोग्य कर्मचाऱ्यांकडून घरोघरी सर्वेक्षण करण्यात येत आहे.



यावेळी दूषित व साचलेले पाणी रिकामे करणे, धूर फवारणी, आवश्यक ठिकाणी अळीनाशक औषधांची मात्रा देणे, रिकामे करता न येणाऱ्या पाणी साठ्यांमध्ये गप्पी मासे सोडणे असे अनेक उपक्रम महापालिकेच्या वतीने राबवण्यात येत आहेत.

किटकजन्य आजारांच्या निर्मूलनासाठी महापालिकेने व्यापक विशेष धूर फवारणी मोहीम हाती घेतली असून आवश्यकतेनुसार सर्व परिसरात धूर फवारणी करण्यात येत आहे. नुकतीच महापालिका कार्यक्षेत्रातील तुर्भे, रोहिंजण, देवीचा पाडा, पडघे गाव, नावडे गाव, तोंडरे गाव, पिसार्वे गाव, ओवे कॅम्प भागात औषध फवारणी धूर मोहीम राबविण्यात येत असल्याची माहिती उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी दिली. गावांमधील घरोघरी जनजागृतीपर हँडबिल पत्रकांचे वाटप करण्यात आले. नागरिकांमध्ये डेंग्यू व मलेरिया आजाराबद्दल प्रबोधन करण्यात येत आहे.

तापाच्या रुग्णांनी रक्तचाचणी करण्याबाबत प्रशासनाच्या वतीने आवाहन करण्यात येत आहे. पालिकेच्या वतीने घरोघरी तसेच शाळांत किटकजन्य आजारांबाबत जनजागृती करण्यात येत आहे. आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळण्याबाबत मार्गदर्शन केले जात आहे. पाणीसाठे आठवड्यातून किमान एकदा रिकामे करून स्वच्छ करावेत, असे आवाहन मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी केले आहे.

## निशू आझादवर एफआयआर दाखल करा ; भारत रक्षा मंचची मागणी

**खारघर : रामप्रहर वृत्त**

निशू आझाद ही मुलगी इन्स्टाग्रामवर हिंदू देवदेवतांवर अभद्र टीका करीत रील टाकत असते. तिच्या एक्स अकाउंटवरही अशा प्रकारचे ट्विट आढळून येतात. हिंदू देवदेवतांची अवहेलना करीत हिंदू धर्मियांच्या भावना दुखावणे व समाजात जातीय आणि धार्मिक तेढ निर्माण करण्याविरोधात भारत रक्षा मंच कोंकण प्रांतच्या खारघर शाखेद्वारा खारघर पोलीस स्टेशनला निवेदन देत निशू आझादवर एफआयआर दाखल करून तिच्यावर प्रतिबंध घालण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

अलीकडे जंतरमंतरवर कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनात 'मोदी की तेहरवीं का खाना खाओ' असे म्हणत समोसे वाटतानाचा तिचा आपत्तीजनक व्हिडीओ सोशल मीडियावर खूप वायरल



झाला होता. यानंतर हिंदू देवदेवतांवर अतिशय घाणेरड्या भाषेत बनवलेले तिचे जुने व्हिडीओ तसेच नुकतेच माता सरस्वतीवर टीका करणारा तिचा व्हिडीओ सोशल मीडियात पाहायला मिळत आहे. निवेदनासोबत निशू आझादच्या एक्स अकाउंटची लिंक तसेच तिचे सोशल मीडियावरील व्हिडीओ हे पुरावे जोडण्यात आले आहेत.

खारघर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ निरीक्षक संदीप जोशी यांनी याबाबत योग्य पडताळणी करून एफआयआर नोंदणी करण्याचे आश्वासन संघटनेच्या कार्यकर्त्यांना दिले. यावेळी भारत रक्षा मंचच्या बीना गोगरी, पंकज तिवारी, अॅड. राजेंद्र अग्रवाल, विष्णू शुक्ला, मुकेश गर्ग, अशोक जांगिड, कैलास पवार, विवेक खिल्लारे, अंजू पटेल, सुशीला शर्मा, नीता गोगरी, नूतन सिंग आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## गौरी-गणपतीसाठी पनवेलची बाजारपेठ सजली

**पनवेल : वार्ताहर**

गणेशाच्या आगमनाची चाहूल लागताच पनवेलमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून घराघरांत बाप्पाच्या स्वागताची जोरदार तयारी सुरू झाली आहे. गणरायाच्या आगमनासोबतच महिला वर्गाला गौरी आगमनाचे वेध लागले असून गौराईच्या स्वागतासाठी आवश्यक विविध साहित्याच्या खरेदीसाठी महिलांची लगबग वाढू लागली आहे.

पनवेलमधील प्रमुख बाजारपेठांतील दुकाने सध्या रंगीबेरंगी सजावटीचे साहित्य,



आकर्षक साड्या, दागिने आणि पारंपरिक वस्तूंनी सजली आहेत. गौरीच्या सजावटीसाठी आवश्यक असलेल्या विविध प्रकारच्या वस्तू मोठ्या प्रमाणात बाजारात दाखल झाल्या असून महिलांकडून त्यांच्या खरेदीला पसंती दिली जात आहे.सुंदर हार, बांगड्या, मंगळसूत्र, नथ, कानातील दागिने यांसह विविध अलंकार महिलांचे लक्ष वेधून घेत आहेत. त्याचबरोबर गौराईच्या सजावटीसाठी लागणारे विविध रंगांचे कापड, फुले, आकर्षक मखर आणि अन्य सजावटीच्या वस्तूही बाजारात उपलब्ध झाल्या आहेत.

साडी, दागिने, पूजेचे साहित्य, फुलांची सजावट तसेच घर सजवण्यासाठी आवश्यक वस्तू खरेदी करण्यासाठी नागरिक बाजारपेठांकडे वळू लागले आहेत. यंदा पारंपरिक साहित्याबरोबरच आधुनिक व आकर्षक सजावटीच्या वस्तूंनाही महिलांकडून पसंती मिळत आहे.



**पनवेल : शहरातील लाईन आळी परिसरात दहीहंडी खेळत असताना चार जणांना विजेचा शॉक लागल्याची घटना गोपाळकाल्याच्या दिवशी घडली होती. जखमींना तातडीने वैद्यकीय उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले. त्यांच्यासाठी महापौर सहाय्यता निधीतून आर्थिक मदत करण्यात आली आहे. यावेळी महापौर नितीन पाटील, सभागृहनेते अॅड. प्रकाश बिनेदार, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर, प्रभाग समिती सभापती अजय बहिरा, नगरसेवक विकास घरत, सुमित झुंजारराव तसेच उमेश इनामदार उपस्थित होते.**

## सीकेटी ज्युनिअर कॉलेजमध्ये शिक्षक दिन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक (सीकेटी ज्युनिअर कॉलेज) विद्यालयात दरवर्षीप्रमाणे यावर्षीही शिक्षक दिन उत्साहात संपन्न झाला. शिक्षक दिनानिमित्त उच्च माध्यमिक विभागाचे कामकाज विद्यार्थी -शिक्षकांनी पाहिले. बारावी कला वाणिज्य विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनी इयत्ता अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना अध्यापन केले. सर्वच विद्यार्थी शिक्षकांचा प्रयत्न कौतुकास्पद होता.

विज्ञान विभागातून साईल पाटील या विद्यार्थ्याने, तर कला व वाणिज्य विभागातून प्रिया तत्वा या विद्यार्थिनीने प्राचार्यांची भूमिका बजावली. विज्ञान विभागातून पर्यवेक्षक म्हणून जान्हवी गुप्ता, चंदना भोपी, तर कला वाणिज्य विभागातून पर्यवेक्षक म्हणून रेणुका पुरोहित या विद्यार्थिनींनी कामकाज पाहिले. कार्यक्रमासाठी उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित



सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील, ज्येष्ठ शिक्षक अरुण पाटील, खंडेराव गायकवाड, साईनाथ पाटील उपस्थित होते.

सहशिक्षिका वैशाली गायकवाड, कौशल्या रेड्डी, अंजली कुलकर्णी, योगिता जोरी या शिक्षकांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. सांस्कृतिक विभागप्रमुख सहशिक्षिका पल्लवी कर्पे यांनी शिक्षक प्रतिनिधी म्हणून शिक्षक दिनानिमित्त आपले मनोगत व्यक्त केले. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेतर्फे शिक्षक दिनानिमित्त प्राचार्य प्रशांत मोरे यांच्या हस्ते उच्च माध्यमिक विभागातील शिक्षकवृंद, कार्यालयीन सेवकवर्ग, चतुर्थश्रेणी कर्मचारी या सर्वांचा भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. आपले मनोगत व्यक्त करताना प्राचार्य प्रशांत मोरे यांनी सर्वप्रथम कार्यक्रमाच्या उत्कृष्ट आयोजनाबद्दल सांस्कृतिक समितीचे कौतुक केले. महाभारतात अर्जुनाला कृष्णाचे मार्गदर्शन लाभल्याने त्यांनी युद्ध जिंकले तशाच प्रकारे इयत्ता अकरावी व बारावीच्या संवेदनशील पिढीला सांभाळण्याचे तसेच मार्गदर्शन करण्याचे उत्तम काम शिक्षक करीत आहेत. शिकणे हे भाग्य आहे तर शिकवणे हे सौभाग्य आहे आणि हे सौभाग्य शिक्षकांना मिळाले आहे. विद्यार्थ्यांचा शिक्षकावर विश्वास असणे महत्त्वाचे आहे आणि या विश्वासास शिक्षकांनी नेहमी पात्र ठरले पाहिजे.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना नेहमी जास्तीत जास्त चांगलेच दिले पाहिजे. त्यासाठी चांगल्या गोष्टी आत्मसात केल्या पाहिजेत व चुकीच्या गोष्टींचा त्याग करता आला पाहिजे. शिक्षकाची जबाबदारी पार पाडताना नवनवीन आव्हाने येत आहेत. त्यांना तोंड देण्यासाठी शिक्षकांनी सतत तयार असले पाहिजे. शेवटी त्यांनी सर्व शिक्षकांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे निवेदन सहशिक्षिका माधुरी पाटील यांनी केले. आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## सीकेटी विद्यालयात शिक्षक दिनानिमित्त विविध उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दरवर्षीप्रमाणे यंदाही सीकेटी इंग्रजी माध्यम विद्यालयात शिक्षक दिन साजरा करण्यात आला. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिनानिमित्त हा दिवस साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधत सीकेटी विद्यालयात शिक्षकांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी Hands-on-craft ही अॅक्टिव्हिटी शिक्षकांसाठी घेण्यात आली,



ज्यात सर्व शिक्षकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत उपक्रमाचा आनंद घेतला. यासाठी विद्यालयातील कला शिक्षक महेश पोपेटा यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर सर्व शिक्षकांसाठी मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, ज्यात सर्व शिक्षकांनी अतिशय उत्साहात सहभाग घेतला. कार्यक्रमाचे नियोजन शिक्षिका सरोज जितेकर व प्राची इसे यांनी केले होते.

शिक्षकांच्या चहापानानंतर छोटीशी भेटवस्तू विद्यालयातर्फे शिक्षकांसाठी देण्यात आली. कार्यक्रम अतिशय उत्साहात पार पडला. कार्यक्रमासाठी इंग्रजी माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका स्वाती काळे, इंग्रजी प्राथमिकच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे, पूर्व प्राथमिकच्या पर्यवेक्षिका वैशाली पारधी, माध्यमिकच्या पर्यवेक्षिका नीरजा अदुरी आणि सर्व शिक्षक उपस्थित होते.

## खारघरमध्ये मेहफिल-ए-अनुराग उत्साहात

### शास्त्रीय संगीताने रसिक मंत्रमुग्ध

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय शास्त्रीय संगीत, नृत्य, भक्तिसंगीत आणि भारतीय संस्कृतीच्या समृद्ध परंपरेचा मनोहारी आविष्कार घडवून आणणारा 'मेहफिल-ए-अनुराग' हा संस्कृतीर दिशारीचा तिसरा भव्य सांस्कृतिक सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात खारघर येथे संपन्न झाला.

सुरेल गायन, कथक नृत्य, तालवाद्यांची दमदार साथ, भावपूर्ण भक्तिसंगीत आणि विविध सांगीतिक रचनांनी सजलेल्या मैफलीने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. सूर, ताल, लय, भाव, नृत्य आणि भक्तीचा सुरेख संगम साधणारी ही मैफल भारतीय सांस्कृतिक वारशाचे वैभव अधोरेखित करणारी ठरली. मैफिलीमध्ये सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक पं. उमेश चौधरी, पं. प्रताप पाटील आणि विदुषी सुरंजना बासू तसेच पं. तुषार चॅटर्जी, रंजना चॅटर्जी आणि सौर्यादीप चॅटर्जी या गायकांनी सुरेल आविष्कार सादर करीत रसिकांना मंत्रमुग्ध केले.



संस्थेच्या सांस्कृतिक प्रवासातील हा तिसरा भव्य सोहळा असून देशाच्या विविध भागांतील नामवंत कलाकारांना एकाच मंचावर आणत रसिकांना दर्जेदार कलाविष्कार अनुभवण्याची संधी या माध्यमातून मिळाली. कार्यक्रमाला प्रमुख मान्यवर म्हणून हभप भजन पंडित निवृत्तीबुवा चौधरी, वसंतशेठ पाटील, भाजपचे जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, पीयूष शहा, सिडको युनियनचे माजी अध्यक्ष जे. टी. पाटील, एमआयडीसी कार्यकारी अभियंता सुभाष कुंभार यांच्यासह अनेक मान्यवर आणि रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात पं. तुषार चॅटर्जी, रंजना चॅटर्जी व सौर्यादीप चॅटर्जी यांच्या सादरीकरणाने झाली. त्यानंतर सादर करण्यात आलेल्या 'चलो मन गंगा यमुना तीर' या भावपूर्ण भजनाने वातावरण भक्तिमय झाले. सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक पं. उमेश चौधरींच्या गायकीने शास्त्रीय व भक्तिसंगीताचा संगम घडवून आणला. पं. उमेश चौधरी यांनी दमदार आणि भावपूर्ण गायकीने मैफलीला वेगळ्या उंचीवर नेले. कार्यक्रमातील विशेष आकर्षण ठरले ते विदुषी सुरंजना बोस यांचे सादरीकरण. त्यांनी राग रागेश्री, ठुमरी, कजरी आणि रागप्रधान रचना सादर करून बहुआयामी गायकीची अनुभूती दिली.

मोंद्रिता चॅटर्जी यांनी कृष्ण वंदना व तराणा सादर केला. पं. प्रताप पाटील व त्यांच्या संचाने पखवाजावर सादर केलेल्या शिव तांडवाने सभागृहात रोमांच निर्माण केला. सांगीतिक सोहळ्याला अनुभवी आणि कुशल साथसंगत लाभली. प्रसाद पाध्ये तबला, मंदार दीक्षित हार्मोनियम, प्रकाश पाटील तबला, चंद्रकांत गायकवाड हार्मोनियम व मिताली पुरारकर यांनी मंजीरावर उत्कृष्ट साथसंगतीने कलाकारांच्या सादरीकरणाला समृद्ध केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोहर भट्टाचार्य यांनी केले.

**शास्त्रीय संगीत केवळ स्वरांची साधना नाही, तर ती संस्कृती, अध्यात्म आणि भक्तिपरंपरेशी जोडणारी भावयात्रा आहे. रागदारी संगीतासोबत अभंग सादर करताना रसिकांपर्यंत हा भक्तिभाव पोहोचवता आला याचा विशेष आनंद आहे. 'मेहफिल-ए-अनुराग'सारख्या उपक्रमातून भारतीय शास्त्रीय संगीताची समृद्ध परंपरा नव्या पिढीपर्यंत पोहोचत राहावी हीच मनापासून इच्छा आहे.**
**-पं. उमेश चौधरी,**
सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक

## दुचाकीची हायड्रा क्रेनला धडक : दुचाकीस्वार जखमी

अल्पवयीन मुलाला दुचाकी चालवण्यास दिल्यानंतर त्याच्याकडून झालेल्या अपघातप्रकरणी दुचाकीस्वारासह वाहनमालकाविरुद्ध पनवेल शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. जेएनपीटी-पळस्पे मार्गावरील टी-पॉइंट पुलाजवळ हा अपघात झाला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार एक अल्पवयीन मुलगा एमएच ४३ सीएच ३५८६ क्रमांकाची दुचाकी आपल्या मैत्रिणीला बरोबर घेऊन चालवत होता. जेएनपीटी-पळस्पे मार्गावरील टी-पॉइंट पुलाजवळ रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून भरधाव वेगाने दुचाकी चालवत असताना त्याचे नियंत्रण सुटले.

## करंजाडेत घरोघरी डस्टबिन वाटप
### ग्रामपंचायतीचा स्तुत्य उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

'स्वच्छ करंजाडे, सुंदर करंजाडे' या ब्रीदवाक्याला प्रत्यक्ष कृतीत उतरवत करंजाडे ग्रामपंचायतीच्या वतीने आणि सरपंच मंगेश शेलार यांच्या पुढाकाराने गावात घरोघरी डस्टबिनचे वाटप मंगळवारी (दि. ८) उत्साहात करण्यात आले.

परिसरातील स्वच्छता आबाधित राहावी आणि कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन व्हावे या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात आला. या वाटप सोहळ्यादरम्यान सरपंच मंगेश शेलार, उपसरपंच सागर आंग्रे, ग्रामविकास अधिकारी मनीषा जायभाये,



ग्रामपंचायत सदस्य अतिश साबळे, बिपिन गायकवाड, नंदकुमार भोईर, कल्पना गायकर, प्रीती शहारे, सुनील भोईर, विनेश गायकर, राजेश भोईर आणि गणेश पोपट उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी आणि ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी ग्रामस्थांना कचऱ्याची विल्हेवाट योग्य पद्धतीने करण्याचे आवाहन केले तसेच करंजाडे गाव सुंदर व आरोग्यादायी ठेवण्यासाठी सर्व नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

संपादकीय

## दुष्काळाचे सावट

राज्य सरकारने परिस्थितीवर लक्ष ठेवून नियोजन सुरू केले असले तरी स्थानिक पातळीवर जलसाठ्यांचे प्राधान्यक्रम ठरवणे, पाणीवापरावर नियंत्रण आणि संभाव्य टंचाईची पूर्वतयारी आवश्यक आहे.

**आकाशाकडे आशेने पाहणाऱ्या राज्यातील बळीराजाची चिंता वाढू लागली आहे. गेल्या जवळपास सव्वा महिन्याच्या काळात राज्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला आहे. पावसाच्या प्रमाणात सुमारे १४.७ टयांची तूट दिसत असल्याचे सांगितले जाते. विशेषतः मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातीलही अनेक भागांत पावसाने दीर्घ खंड घेतल्याने खरीप पिके करपण्याची वेळ आली आहे. मराठवाड्यात गेल्या २६ दिवसांपासून पावसाचा खंड असून अनेक जिल्ह्यांतील पिके करपल्याने शेतकरी धास्तावला आहे. काही भागांत सोयाबीन, कापूस, बाजरी, मूग यांसारखी पिके वाचविणेही कठीण झाले आहे. मराठवाड्यात काही महसूल मंडलांमध्ये ३८ दिवसांपासून पाऊस झालेला नाही. खरीप हंगाम हातातून निसटू लागल्याने आता प्रश्न केवळ हेक्टरी नुकसानीचा नाही तर रब्बीच्या नियोजनाचा आहे. गणेशोत्सवात चांगला पाऊस पडला तर रब्बी पिकांची आखणी होऊ शकते अशी आशा शेतकऱ्यांना वाटते आहे. तरीही पुढील सहा-सात महिने पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा आणि शेतीसाठी उपलब्ध जलसाठा यांचा काटेकोर ताळेबंद करणे भाग पडणारच आहे. जायकवाडी वगळता अन्य धरणांमध्ये पिण्यासाठी पाणी राखून ठेवावे असा आदेश देण्यात आला आहे. गेली काही वर्षे महाराष्ट्र सातत्याने कोरडा आणि ओला असा दोन्ही स्वरुपाचा दुष्काळ सोसतो आहे. आताही सरकारने कोरडा दुष्काळ जाहीर करावा, चारा छावण्या सुरू कराव्यात व प्रतिहेक्टरी ५० हजार रुपयांची मदत जाहीर करावी अशी मागणी मराठवाड्यातील शेतकरी करू लागले आहेत. गेल्या वर्षी अतिवृष्टी आणि पुरामुळे बाधित तालुक्यांसाठी विशेष मदत पॅकेज लागू करण्यात आले होते. पण मदत देत राहून दुष्काळाचे चक्र कायमचे संपणार कसे या प्रश्नावरही विचार होणे आवश्यक आहे. त्याचे उत्तर पाण्याच्या बचतीत आणि जलव्यवस्थापनाच्या बदललेल्या दृष्टिकोनात आहे. ठिबक-सिंचन, तुषारसिंचन, शेततळी, जलसंधारण, पाणलोट विकास आणि कमी पाण्यात येणाऱ्या पिकांकडे वळणे याला आता पर्याय नाही. ऊसासारख्या अधिक पाणी लागणाऱ्या पिकाचे स्थानिक पर्जन्यमानानुसार नियोजन करावे लागेल. एकंदर नियोजनात कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे नवी दिशा मिळण्यात मदत होऊ शकेल. हवामानाचा अंदाज, पिकांची पाण्याची गरज आणि रोग-किडींचे पूर्वानुमान यासंदर्भात एआयची मदत शेतकऱ्यांना होऊ शकेल. शेतीसंदर्भात अशातऱ्हेने तंत्रज्ञानाचा वापर होणे आवश्यक आहे. हवामान बदलांतून शेतीसमोर नवी आव्हाने उभी राहात आहेत. कधी पाऊस कमी होतो तर कधी अल्प काळात अतिवृष्टी होते. कधी बरेच दिवस पाऊस दडी मारतो. एकंदर पाऊस अधिकच बेभरवशाचा झाला आहे. त्याचा थेट परिणाम पीकउत्पादनावर आणि त्यांच्या बाजारभावांवर होतो आहे. पिकांचे उत्पादन घटले की पुरवठा कमी होऊन महागाईचा दबाव वाढतो. म्हणूनच पावसाचे प्रमाण आणि महागाई यांचा थेट संबंध कायमच असत आला आहे. तातडीची मदत ही सरकारची जबाबदारी आहेच. पण दुष्काळाला केवळ पॅकेजच्या साह्याने तोंड देता येणार नाही. जलसंधारण, आधुनिक तंत्रज्ञान, पीकपद्धतीतील बदल आणि सामूहिक पाणीशिस्त यांची सांगड घालणे हा कायमस्वरूपी उपाय आहे. सध्याची दुष्काळाची छाया लक्षात घेता महाराष्ट्राने प्रत्येक थेंबाचे नियोजन करून भविष्यातील दुष्काळाला उत्तर देण्याची तयारी आतापासूनच सुरू करायला हवी.**

# सामाजिक जबाबदारीचा दीप प्रज्वलित करूया!

हवा, पाणी, ध्वनी आणि प्लास्टिकचे प्रदूषण वाढत असतानाच समाजाच्या विचारांचे, भाषेचे आणि वर्तनाचेही प्रदूषण वाढताना दिसते. हे केवळ काही घटनांचे चित्र आहे की काळोखाच्या अजगराने आपल्या समाजाचा उजेडच गिळून टाकला आहे?

'काळोख' म्हणजे केवळ अंधार नव्हे. तो आहे हिंसा, भय, भ्रष्टाचार, अन्याय, स्वार्थ, द्वेष, व्यसन, गुंडगिरी, असत्य, कायद्याचा अवमान आणि माणुसकीचा ऱ्हास. 'उजेड' म्हणजे सत्य, विवेक, प्रामाणिकपणा, न्याय, बंधुता, समानता, संवेदनशीलता आणि माणसावरील विश्वास. समाजाचा खरा उजेड दिव्यांमध्ये नसतो; तो माणसांच्या आचरणात असतो.

घराबाहेर पडताना सुरक्षिततेची चिंता, मुलांच्या भवितव्याची काळजी आणि प्रामाणिकपणे जगताना आपले नुकसान होईल का, अशी भीती निर्माण होणे ही समाजाच्या आरोग्यासाठी धोक्याची घंटा आहे. वाढती गुंडगिरी, धमक्या, अपहरण, मारामाऱ्या आणि हिंसाचारामुळे केवळ एखाद्या व्यक्तीला इजा होत नाही; तर समाजाच्या मनातील सुरक्षिततेचा आधारच हादरतो.

महिलांवरील लैंगिक अत्याचार ही या काळोखाची अत्यंत वेदनादायक बाजू आहे. स्त्रीकडे माणूस म्हणून पाहण्याऐवजी तिच्यावर सत्ता गाजवण्याची वृत्ती संपली पाहिजे. स्त्रीचा सन्मान आणि सुरक्षितता ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. त्याचप्रमाणे कुटुंबातील संशय, मानसिक छळ, शिवीगाळ आणि शारीरिक हिंसा यांचाही गंभीर विचार करावा लागेल. प्रत्येक घटस्फोटामागे वेगवेगळी कारणे असतात; त्यामुळे घटस्फोटालाच दोष न देता संवादाचा अभाव, असमानता, व्यसन, हिंसा, आर्थिक ताण आणि परस्पर सन्मानाचा अभाव यांसारख्या कारणांवर समाजाने विचार करायला हवा.

धर्म माणसाला करुणा, संयम आणि बंधुभाव शिकवतो; पण धर्मांधता विवेकावर मात करते तेव्हा तरुण विचाराऐवजी हिंसेचा मार्ग स्वीकारतो. धर्माच्या नावावर दुसऱ्याचा द्वेष करणे किंवा जमावाच्या मानसिकतेतून हिंसा करणे हा धर्माचा विजय नसून माणुसकीचा पराभव आहे. आपल्याला कोणत्याही एका धर्माच्या सत्तेने चालणारा भारत नको; संविधानाच्या मूल्यांनी उजळलेला, सर्वांना समान सन्मान देणारा आणि बंधुभावाने जोडलेला भारत हवा.

भ्रष्टाचार, चोरी, फसवणूक आणि सार्वजनिक संपत्तीचा अपहार यामुळेही समाजाचा उजेड मावळतो. "असेच चालते", "सगळेच करतात", "थोडी तडजोड केली तर काय बिघडते?" या मानसिकतेतून चुकीच्या गोष्टींना सामाजिक मान्यता मिळू लागते. सार्वजनिक संपत्ती ही कोण्या एका व्यक्तीची नसते; ती जनतेच्या करातून उभी राहिलेली सामूहिक संपत्ती असते. तिचे नुकसान म्हणजे प्रत्येक नागरिकाच्या हक्काचे नुकसान होय.

बेरोजगारी आणि सामाजिक-आर्थिक विषमता यामुळे अनेक तरुणांच्या मनात अस्वस्थता निर्माण होते. त्यात दारू, अमली पदार्थ, जुगार, ऑनलाइन सट्टा आणि झटपट पैसा मिळवण्याची मानसिकता मिसळली की व्यक्ती आणि कुटुंब दोन्ही उद्ध्वस्त होऊ शकतात. कष्टाऐवजी शॉर्टकटच्या मागे धावण्याची वृत्ती वाढणे ही केवळ आर्थिक नव्हे, तर सामाजिक आणि नैतिक समस्याही आहे. कष्टाला प्रतिष्ठा आणि प्रामाणिक श्रमाला सन्मान मिळाला पाहिजे.

प्रदूषणाची समस्या केवळ हवा, पाणी, ध्वनी किंवा प्लास्टिकपुरती मर्यादित नाही. विचारांचे प्रदूषण, द्वेषाची भाषा, खोट्या माहितीचा प्रसार आणि असंवेदनशील वर्तन हेही समाजाला आतून प्रदूषित करते. सोशल मीडियामुळे माहिती क्षणार्धात पोहोचते; पण त्याच वेगाने अफवा, खोटी माहिती आणि बदनामीही पसरते. म्हणून काहीही पुढे पाठवण्यापूर्वी सत्यता तपासणे आणि दुसऱ्याच्या प्रतिष्ठेचा विचार करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. माहितीचा वेग वाढला आहे; आता विवेकाचाही वेग वाढवण्याची वेळ आलीय.

पत्रकारांवर होणारी मारहाण ही लोकशाहीसाठी चिंतेची बाब आहे. पत्रकाराचे मत पटले नाही, म्हणून त्याच्यावर हल्ला करण्याचा अधिकार कोणालाही नाही. टीकेचे उत्तर तथ्यांनी, संवादाने आणि कायदेशीर मार्गाने द्यावे. त्याचप्रमाणे जमावाने कायदा हातात घेणे, सार्वजनिक संपत्तीची तोडफोड करणे किंवा बळाच्या जोरावर न्याय देण्याचा प्रयत्न करणे हे लोकशाहीचे लक्षण नाही. कायद्यापेक्षा कोणीही मोठे नाही आणि लोकशाहीपेक्षा कोणतीही व्यक्ती मोठी नाही.

म्हणूनच शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शिक्षणाने केवळ "मी मोठा कसा होऊ?" हा प्रश्न निर्माण करून चालणार नाही; त्यासोबत "मी चांगला माणूस कसा होऊ?" हा प्रश्नही निर्माण झाला पाहिजे. गुण, पदवी, नोकरी आणि पैसा आवश्यक आहेत; पण त्यांच्यासोबत विवेक, वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवता, स्त्री-सन्मान, संविधाननिष्ठा, कायद्याचा आदर आणि सामाजिक जबाबदारी नसेल तर शिक्षण अपूर्ण राहते.

तरीही संपूर्ण समाज काळोखात बुडाला आहे असे म्हणणे चुकीचे ठरेल. आजही असंख्य शिक्षक प्रामाणिकपणे शिकवत आहेत, शेतकरी कष्ट करत आहेत, कामगार घाम गाळत आहेत, डॉक्टर सेवा देत आहेत, स्वच्छता कर्मचारी आपले कर्तव्य पार पाडत आहेत आणि सामाजिक कार्यकर्ते वंचितांसाठी झटत आहेत. सामान्य नागरिकही अनेक ठिकाणी माणुसकी जपत आहेत. चांगुलपणा शांत असतो; वाईट मात्र मोठा आवाज करते. म्हणून उजेडाच्या या शांत शक्तींनी आता अधिक संघटित आणि जागरूक होणे आवश्यक आहे. उजेडाचे प्रतिनिधी तयार करून ते लोकशाहीचे रक्षक म्हणून काम करतील याची व्यवस्था जनतेनेच केली पाहिजे.

समाजाचे आरोग्य केवळ रुग्णालये आणि औषधांनी चांगले होत नाही; समाजाच्या विचारांचे, वर्तनाचे आणि नैतिकतेचे आरोग्यही चांगले असावे लागते. मुलांपासून वृद्धांपर्यंत प्रत्येकाने आपल्या आचरणातून सत्य, संयम, बंधुभाव, कायद्याचा आदर आणि मानवता जपली पाहिजे. घरातून संस्कार, शाळेतून मूल्यशिक्षण, समाजातून सहकार्य आणि सार्वजनिक जीवनातून जबाबदारी निर्माण झाली तर उजेड पुन्हा विस्तारेल.

उजेडाचे वारसदार सक्रिय झाले पाहिजेत. सद्गुणांची शक्ती संघटित झाली पाहिजे. नैतिकतेचा आवाज प्रखर झाला पाहिजे आणि लोकशाहीची सामूहिक शक्ती जागी झाली पाहिजे. तेव्हाच काळोखाचा अजगर कितीही मोठा असला तरी त्याची पकड सैल होईल.

**-प्रा.डॉ. सुभाष वाघमारे,** संचालक,
साहित्यवेल वाचन प्रसार चळवळ

# प्रसिद्ध गायक आणि संगीतकार श्रीधर फडके




श्रीधर सुधीर फडके यांचा जन्म विख्यात गायक, संगीत दिग्दर्शक सुधीर फडके आणि विख्यात पार्श्वगायिका ललिता फडके यांच्या पोटी मुंबई येथे ९ सप्टेंबर १९५० साली झाला. त्यामुळे श्रीधर यांना घरातून संगीताचा वारसा मिळाला आणि त्यांच्यावर बालपणापासून संगीताचे उत्तम संस्कार झाले.

मुंबईतील बालमोहन विद्यामंदिर, लोकमान्य विद्यामंदिरात त्यांचे शालेय शिक्षण झाले व रूपारेल महाविद्यालयातून एमएस्सी पदवी घेऊन पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूट ऑफ न्यूयॉर्क येथून त्यांनी एमएस कॉम्प्युटर पूर्ण केले आणि त्यात चांगले करिअरसुद्धा केले. शिकत असताना त्यांनी भावगीतांची ध्वनिफीत काढली होती. संगीत क्षेत्रातील श्रीधर फडके यांची पहिली लक्षणीय कामगिरी म्हणजे त्यांनी संत ज्ञानदेव विरचित हरिपाठातील 'देवाचिये द्वारी' या अभंगाला लावलेली सुमधुर चाल. या वेळी ते अमेरिकेत शिक्षण घेत होते.

'लक्ष्मीची पावले' हा श्रीधर फडके यांनी संगीत दिलेला पहिला चित्रपट होय. यातील 'फिटे अंधाराचे जाळे' हे गीत फारच गाजले. याला अमाप लोकप्रियता लाभल्यामुळे संगीत विश्वातील त्यांचे स्थान भक्कम झाले.

'ओंकार स्वरूपा', 'ऋतु हिरवा' या ध्वनिफितींतील त्यांनी स्वरबद्ध केलेली गीते अत्यंत लोकप्रिय ठरली. 'काही बोलायाचे आहे' ही त्यांनी गायलेल्या गीतांची ध्वनिफीत, पद्मजा फेणाणी-जोगळेकर यांच्या सहगायनातील 'हे गगना', आरती अंकलीकर व सुरेश वाडकर यांनी गायलेली 'तेजोमय नादब्रह्म' आणि 'सुखवरदा रामा', 'संगीत मनमोही रे', इ. ध्वनिचकत्यांतील गीते लोकप्रिय झालेली आहेत. लोकप्रियतेच्या मानांकनासाठी त्यांच्या चार ध्वनिचकत्यांना 'प्लॅटिनम डिस्क' बहाल झाली आहे.

एअर इंडियातील वरिष्ठ पदावरून ते निवृत्त झालेत. हा संगीताचा छंद, त्यांनी नोकरी सांभाळून जोपासला. निवृत्तीनंतर पूर्ण वेळ संगीतकार व गायक म्हणून त्यांची वाटचाल चालू आहे. (साभार इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

## चॅटजीपीटी मोफत वापरणाऱ्यांना पाहाव्या लागणार जाहिराती

आज एआय आपल्या जीवनाचा एक भाग बनले आहे. कार्यालयीन कामांपासून ते मुलांच्या शिक्षणापर्यंत आणि दैनंदिन कामांपर्यंत, लोक एआय साधनांचा मोठ्या प्रमाणावर वापर करत आहेत. चॅटजीपीटी हे त्यापैकी एक सर्वात लोकप्रिय साधन आहे. हे वापरकर्ते याची विनामूल्य व्हर्जन वापरत आहेत, त्यांना एक लक्षणीय बदल जाणवू शकतो.



ChatGPTच्या मोफत व्हर्जनमध्ये, आता तुम्हाला प्रश्नांच्या उत्तरांसोबत प्रायोजित जाहिराती दिसू शकतात. याचा अर्थ असा की, जेव्हा तुम्ही एखाद्या प्रश्नाचे उत्तर वाचता, तेव्हा तुम्हाला त्याखाली एखाद्या कंपनीची किंवा उत्पादनाची जाहिरात दिसू शकते. आपल्या सबस्क्रिप्शन मॉडेल व्यतिरिक्त, ओपनएआय जाहिरातींद्वारे महसूल मिळवण्याचा एक मार्ग देखील विकसित करत आहे. त्यामुळे भविष्यात मोफत वापरकर्त्यांसाठी चॅटजीपीटीचा अनुभव थोडा बदलू शकतो.

ChatGPTचा वापरकर्ता वर्ग वाढत असल्यामुळे, OpenAIने जाहिरातींसाठी तयारी सुरू केली आहे. या जाहिराती केवळ ChatGPT मोफत वापरणाऱ्या वापरकर्त्यांनाच दिसू शकतात. प्रत्येक प्रश्नाखाली जाहिराती दिसतील. कोणत्या वापरकर्त्यांना जाहिराती दिसतील आणि त्या कशा दाखवल्या जातील, हे प्लॅटफॉर्मच्या प्रणाली आणि जाहिरात मॉडेलवर अवलंबून असेल.

तुम्ही ChatGPTला एका उत्पादनाबद्दल प्रश्न विचारला. ChatGPT नेहमीप्रमाणे प्रतिसाद देईल. त्या उत्तराखाली, तुम्हाला एक छोटी प्रायोजित जाहिरात दिसू शकते. जर तुम्हाला जाहिरातीत दाखवलेले उत्पादन आवडले, तर तुम्ही त्याबद्दल अधिक जाणून घेऊ शकता किंवा ते खरेदी करू शकता. यामुळे कंपन्यांना संभाव्य ग्राहकांपर्यंत आपल्या उत्पादनांची जाहीरात करण्यासाठी एक नवीन व्यासपीठ मिळते.

कंपन्या ChatGPTवर जाहिराती प्रदर्शित करण्यासाठी OpenAIच्या ॲड्स प्लॅटफॉर्मचा वापर करू शकतात. यामुळे कंपन्यांना त्यांच्या जाहिरातींद्वारे संभाव्य ग्राहकांच्या मोठ्या वर्गापर्यंत पोहचता येईल.

अहवालानुसार कंपन्यांसाठी जाहिरात करण्याची सुरुवातीची किंमत प्रति दिन सुमारे ७२५ रुपये असू शकते. किंमत आणि जाहिरातींची उपलब्धता यांसारख्या अटी कालांतराने बदलू शकतात. जाहिरातदारांना तुमचे ChatGPT चॅट्स वाचता येतील का? हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे.

# धवल क्रांतीचे जनक डॉ. वर्गीस कुरियन



निमित्त

भारतातील धवल क्रांतीचे पितामह डॉ. वर्गीस कुरियन यांची आज ९८वी पुण्यतिथी. त्यांचा जन्म २६ नोव्हेंबर १९२१ रोजी केरळ राज्यातील कोझिकोड (कालिकत) शहरात झाला. त्यांचे वडील सरकारी रुग्णालयात शल्यतज्ज्ञ होते. कुरियन यांनी मद्रासच्या लॉयोला कॉलेजमधून भौतिकशास्त्रातील पदवी मिळवली. विद्यार्थी दशेत त्यांनी लॉयोला कॉलेजचे क्रिकेट, बॅडमिंटन, मुष्टियुद्ध आणि टेनिसमध्ये प्रतिनिधित्व केले होते. त्यांनी गिंडी येथील अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश घेतला आणि मद्रास (सध्याच्या चेन्नई) विश्वविद्यालयाची यंत्र अभियांत्रिकी (मेकॅनिकल इंजिनीअरिंग) पदवी मिळविली.


अल्प काळासाठी टाटा आयर्न अँड स्टील कंपनीत नोकरी करून वर्गीस यांनी इंपिरियल इन्स्टिट्यूट ऑफ निमल हजबंड्री ॲण्ड डेअरी इंजिनीअरिंगसाठी प्रवेश घेतला. सध्या ही संस्था बंगळुरूत असून आता या संस्थेचे नाव नॅशनल डेअरी रिसर्च इन्स्टिट्यूट-सदर्न रिजनल सेंटर आहे. डेअरी टेक्नॉलॉजी अभ्यासक्रमासाठी त्यांना मिशिगन स्टेट युनिव्हर्सिटीत प्रवेश हवा होता. प्रवेशासाठी कुरियन यांना भारत सरकारची शिष्यवृत्ती मिळाली होती, पण प्रवेशपूर्व अट म्हणून मेटॅलर्जीत अभियांत्रिकी पदव्युत्तर पदवीबरोबर डेअरी इंजिनीअरिंग हा दुय्यम विषय घेणे अनिवार्य होते. या अटींची पूर्तता करून मिशिगनमधून मास्टर्सची पदवी मिळवून ते भारतात परतले. डेअरी इंजिनीअर म्हणून कुरियन १९४९मध्ये आणंदच्या गव्हर्नमेंट रिसर्च क्रीमरीत पाच वर्षांच्या कालावधीसाठी रुजू झाले. तेथे त्यांचा त्रिभुवनदास पटेल यांच्याशी परिचय झाला.

त्रिभुवनदास यांना त्या काळी लहान दूध उत्पादकांसाठी आणंद येथे सहकारी दूध संघटना स्थापन करायची होती. मध्यंतरीच्या काळात १९५२-५३मध्ये कुरियन यांनी भारत सरकारच्या पुरस्काराने न्यूझीलंडमध्येही दुग्ध यांत्रिकी शिक्षण घेतले तसेच न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियामधील सहकारी दूध व्यवस्थेचाही अभ्यास केला. त्रिभुवनदास पटेल यांचा उपक्रम भावल्यामुळे सुरक्षित सरकारी नोकरी सोडून कुरियन यांनी खेडा जिल्ह्यातील चळवळीत उडी घेतली. कुरियन यांनी न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियात केलेल्या सहकारी दूध व्यवस्थेच्या अभ्यासाचा खेडा डिस्ट्रिक्ट कोऑपरेटिव्ह मिल्क प्रॉड्युसर्स युनियन लिमिटेड (KDCMPUL) म्हणजेच अमूलची बांधणी करण्यासाठी उपयोग केला.

कुरियन यांनी १९५५मध्ये न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियात केलेल्या अभ्यासातून प्रेरणा घेऊन जगातील पहिला म्हशीच्या दुधाची पावडर बनवण्याचा प्रकल्प आणंदमध्ये केला. दुधातील पाण्याचे प्रमाण कमी करून अतिशय दाट (कन्डेस्ड) टिकाऊ दूध बनवण्याचे तंत्र कुरियन यांचे अमेरिकेत राहणारे अभियंता वर्गमित्र, एच.एम. दलाया यांनी विकसित केले होते.

कुरियन यांची योजकता दुधापुरतीच मर्यादित राहिली नाही. तेलबिया, खाद्य तेलाच्या बाबतीतही भारत स्वयंपूर्ण व्हावा अशी भारत सरकारची आकांक्षा होती. पूर्वानुभवामुळे कुरियन यांना हे केवळ तीन वर्षांत साध्य झाले. आपल्या आठवणी, विचार कुरियन यांनी पुस्तकांत नोंदवून ठेवल्या. त्यांच्या पुस्तकांची नावे आहेत, 'आय टू हॅड ड्रीम', 'द मॅन हू मेड द एलिफंट डान्स' आणि 'न अनफिनिश्ड ड्रीम.' त्यांना विविध पुरस्कार मिळाले. गुजरातेतील नडियाद येथे ९ सप्टेंबर २०१२ रोजी अल्पशा आजारानंतर त्यांचा मृत्यू झाला. (साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

## आतड्यांतील घाण साफ करतात 'हे' पाच पदार्थ

लहान आतडे आणि मोठे आतडे हे आपल्या शरीराच्या पचनसंस्थेतील महत्त्वाचे अवयव आहेत. अन्नातून निरोगी आणि पौष्टिक गोष्टींचे पचन करणे हे आतड्यांचे कार्य असते, पण शरीरातील टाकाऊ पदार्थ काढून टाकण्याचे कामही ते करतात. त्यामुळे निरोगी शरीरासाठी आतड्यांचे आरोग्य सुस्थितीत राखणे गरजेचे आहे. आतड्यांच्या चांगल्या आरोग्यासाठी आता काय खावे, काय खाऊ नये याबाबत अनेक जण सजग आहेत. या पार्श्वभूमीवर आतड्यांचे आरोग्य सुधारण्यासाठी आपण कसे जेवावे हे माहीत असणेही गरजेचे आहे.



आतड्यांमधील घाण काढून टाकतील हे पाच सुपरफूड्स

१. दही

दही एक प्रो-बायोटिक आहार आहे, ज्यामध्ये आतड्यांसाठी अनुकूल जीवाणू असतात. दही आतड्यांतील चांगल्या जीवाणूंची संख्या वाढविण्यास आणि पचन सुधारण्यास मदत करते. त्याचबरोबर अनारोग्यास कारणीभूत ठरणारे प्रतिकूल जीवाणू काढून टाकण्यासाठीही दही हा उत्तम स्रोत आहे.

२. कच्ची केळी

कच्ची केळी खाल्ल्याने आरोग्यदायी आत मायक्रोबायोम वाढण्यास मदत होते. ते प्रतिरोधक स्टार्चने समृद्ध असतात आणि रक्तातील साखरेचे नियमन करू शकण्यासह इन्सुलिन संवेदनशीलता सुधारू शकतात.

३. अळशी

विरघळणारे फायबर आणि ओमेगा-३ फॅटी ॲसिडस् यांनी समृद्ध असलेली अळशी आतड्यांची जळजळ कमी करते आणि हृदयाच्या आरोग्यास समर्थन देते. दररोज आपल्या आहारात एक-दोन चमचे अळशीचा समावेश करा.

४. ॲव्होकॅडो

विरघळणाऱ्या फायबरव्यतिरिक्त यात निरोगी चरबी असते. त्यामुळे पोषक शोषण क्षमता सुधारते आणि निरोगी आतड्यांतील मायक्रोबायोमला समर्थन देते. दिवसाकाठी अर्धा ॲव्होकॅडो चांगला आहे.

५. ग्लुटेनमुक्त ओट्स

ग्लुटेनमुक्त ओट्स हा विरघळणाऱ्या फायबरचा चांगला स्रोत आहे आणि त्यामुळे आतड्यांच्या आरोग्यास मदत मिळते. तसेच त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित होऊन, हृदयाच्या आरोग्यास प्रोत्साहन लाभते. दररोज ३० ग्रॅम (एक वाटी) शिजविलेले ग्लुटेनमुक्त ओट्स सेवन करण्याचे लक्ष्य ठेवा.

# दिघीत साडेनऊ किलो गोमांस जप्त; दोघे ताब्यात



**श्रीवर्धन : वार्ताहर**

श्रीवर्धन तालुक्यातील दिघी सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत पुन्हा एकदा गोमांसाची वाहतूक पकडण्यात आली असून साडेनऊ किलो गोमांसासह दोघे जण पोलिसांच्या ताब्यात आहेत. मागील तीन-चार महिन्यांपासून श्रीवर्धन पोलीस उपविभागामधील श्रीवर्धन, म्हसळा, दिघी सागरी या तिन्ही पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये अनेक वेळा गोमांस कत्तल किंवा गोमांस वाहतूक पकडण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे. ज्या ठिकाणाहून गोमांसाची वाहतूक होते, त्या ठिकाणी गोमांस किंवा गोवंशीय जनावरांची कत्तल श्रीवर्धन तालुक्यात खुलेआमपणे होत असल्याचा संशय विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांकडून व्यक्त केला जात आहे.

श्रीवर्धन येथे पकडण्यात आलेले गोमांस हे माणगाव तालुक्यातील मोरबा येथून आणल्याचे निष्पन्न झाले होते, परंतु मोरबा येथील गोमांस कत्तल कोण करते, याबाबत मात्र पोलीस प्रशासनाकडून अद्याप खुलासा करण्यात आलेला नाही. दुपारी दिघी सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये गोंडघर फाटा या ठिकाणी दोन युवकांना मोटारसायकलवरून गोमांस घेऊन जात असताना पोलिसांकडून ताब्यात घेण्यात आले आहे.

त्यांच्याकडे जवळजवळ साडेनऊ किलो गोमांस असल्याचे निष्पन्न झाले आहे. महाराष्ट्र शासनाने गोवंश हत्येचा कायदा लागू केल्यानंतरही रायगड जिल्ह्यातील काही तालुक्यांमध्ये खुलेआमपणे गोवंशाची कत्तल केली जात आहे. याप्रकरणी दिघी सागरी पोलीस ठाण्यात गु. र. क्र. १९/२०२६, भारतीय न्याय संहिता २०२३चे कलम ३२५, ३(५) सह महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ चे कलम ५, ५(क), ९, ९(अ) सह प्राण्यांस क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियम १९६० चे कलम ११ (ल) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गोंडघर फाट्यावर गोमांसाची वाहतूक करणारे तरुण हे म्हसळा तालुक्यातील असून त्यांनी सदरचे गोवंशीय मांस कोठून आणले व कोठे नेत होते, याबाबतही सखोल माहिती उपलब्ध होणे आवश्यक आहे. याबाबत पोलिसांनी लवकरात लवकर योग्य तो तपास करावा, अशी मागणी विश्व हिंदू परिषदेचे रायगड जिल्हा सहमंत्री जितेंद्र करंजकर, श्रीवर्धन प्रखंड अध्यक्ष संतोष चौकर व श्रीवर्धन गोरक्षा प्रमुख अजय चव्हाण यांनी केली आहे.


### ग्रुप ग्रामपंचायत तुपगांव

ईमेल आय डी gptupgaon@gmail.com
कार्यालय पत्ता :- मु. तुपगांव., पो. चौक, ता. खालापूर, जि. रायगड., पिन नं ४१० २०६

#### निविदा सूचना

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | १% कपात करावयाची रक्कम | निविदा फी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | ड्रेनेज वहिनींची दुरुस्ती करणे | १०५००० | १०५० | २००/- | १५ वा वित्त आयोग |
| २ | तुपगांव अंतर्गत गटार दुरुस्ती करणे | १६०००० | १६०० | २००/- | १५ वा वित्त आयोग |
| ३ | पाली खुर्द अंतर्गत गटार दुरुस्ती करणे | ७०००० | ७०० | २००/- | १५ वा वित्त आयोग |
| ४ | गटार बांधकाम करणे | १०००० | १००० | २००/- | १५ वा वित्त आयोग |
| ५ | ग्रा.पं.तुपगांव अंतर्गत गटार दुरुस्ती करणे | १२५००० | १२५० | २००/- | १५ वा वित्त आयोग |
| ६ | ग्रा.पं. तुपगांव हद्दीतील गटार बांधकाम करणे | २६८६०० | २६८६ | २००/- | १५ वा वित्त आयोग |
| ७ | शाळेचे दरवाजे/खिडक्या/गेट फिक्सचर दुरुस्ती करणे | ५०००० | ५०० | २००/- | १५ वा वित्त आयोग |
| ८ | पेव्हर ब्लॉक चे बांधकाम करणे | ९३००० | ९३० | २००/- | १५ वा वित्त आयोग |
| ९ | ग्रामपंचायत तुपगांव हद्दीतील रस्त्यांचे बांधकाम करणे | २१८११९ | २१८१ | २००/- | १५ वा वित्त आयोग |
| १० | मागासवर्गीय वस्तीत रस्ते व गटारे करणे | १५२५४४ | १५२५ | २००/- | १५ वा वित्त आयोग |
| ११ | ग्रामपंचायत तुपगांव पाण्याच्या टाकीची गळती काढणे | ५१९३२९ | ५१३९ | २००/- | १५ वा वित्त आयोग |
| १२ | सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन - तुपगांव | ७५२७१० | ७५२७ | २००/- | सांडपाणी घनकचरा व्यवस्थापन |
| १३ | सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन - पाली खुर्द | १२८६०२ | १२८६ | २००/- | सांडपाणी घनकचरा व्यवस्थापन |

**अटी व शर्ती खालीलप्रमाणे :-**

१) निविदा फॉर्म ग्रामपंचायत कार्यालयात दि.०९/०९/२०२६ ते १५/०९/२०२६ पर्यंत दु.१२.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात मिळतील.
२) तरी इच्छुक पुरवठादारांनी आपल्या सीलबंद निविदा दिनांक १५/०९/२०२६ रोजी दु. २.०० वाजेपर्यंत रोजी कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात स्वीकारण्यात येतील.
३) सीलबंद निविदा ग्रामपंचायत कार्यालयात दि. १५/९/२०२६ रोजी सायंकाळी ४.०० वा सीलबंद निविदा फोडण्यात येईल.
४) मुदतीनंतर आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.
५) शासकीय नियमाप्रमाणे आयकर, सेवाकराचे रक्कमा कपात करण्यात येईल.
६) विकास कामाचे बिलाचे एकूण रक्कमेपैकी ५ टक्के रक्कम हि काम पूर्ण झाल्याच्या दिनांकापासून सहा महिने कालावधीसाठी रक्षा अनामत म्हणुन कपात करणेत येईल.
७) कोणतीही एक अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा पुन्हा निविदा मागविण्याचा अधिकार तसेच निविदा सूचनेत बदल करणेच अधिकार ग्रुप ग्रामपंचायत तुपगांवने राखून ठेवला आहे.
८) ) अंदाजपत्रकात ठरवून दिलेल्या तपशिलाप्रमाणे साहित्य वापर करणे बंधनकारक राहील.
९) काही अपरिहार्य करणास्तव बिलाची रक्कम अदा करण्यास विलंब झाल्यास या कार्यालयास कोणताही दावा करता येणार नाही.
१०) पूर्ण करणेत आलेल्या कामाची किमान एक वर्ष विनामूल्य देखभाल करण्याची जबाबदारी ठेकेदारावर राहील.
११) सदरील ठेकेदार हा जि.एस.टी. धारक असणे आवश्यक आहे.

ठिकाण :- तुपगांव
दिनांक :- ०९/०९/२०२६
जा.क्र. २६९/२०२६-२७

**सही/-**
**विश्वास शिला नवनाथ वारे**
ग्रामपंचायत अधिकारी

**सही/-**
**रवींद्र लक्ष्मण कुंभार**
सरपंच


## मानसी दळवी यांना पुरस्कार

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद सदस्या तथा शिवसेना गटनेत्या मानसी दळवी यांना त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि कौटुंबिक योगदानाची दखल घेत पार्वतीबाई धोंडीबा धनकुडे आदर्श माता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

श्री पांडुरंग देवालय ट्रस्ट, बाणेर यांच्या माध्यमातून आणि श्री भैरवनाथ शिक्षण संस्था प्रणित हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा गौरव व्हावा, तसेच मातृत्वाच्या भूमिकेतून कुटुंबासोबतच समाजाच्या जडणघडणीत योगदान देणाऱ्या महिलांना प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने या पुरस्काराचे आयोजन करण्यात आले होते.

हा सन्मान केवळ आपला नसून कार्यात साथ देणारे कुटुंबीय, सहकारी व नागरिकांचाही असल्याचे मानसी दळवी यांनी सांगितले. मातृत्व ही केवळ कुटुंबाची जबाबदारी नसून पुढील पिढी घडविण्याची मोठी सामाजिक जबाबदारी आहे. महिलांनी कुटुंब सांभाळतानाच समाजहितासाठीही पुढाकार घ्यावा, असे त्या म्हणाल्या.







### कुळगांव बदलापूर नगर परिषद

नवीन प्रशासकीय इमारत, म. गांधी चौक रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन-४२१५०३. ता. अंबरनाथ जि. ठाणे.
ईमेल : coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in वेबसाईट : http://kbmc.gov.in

जा.क्र.: साबां./८०७/२०२६-२७ दिनांक : ०८/०९/२०२६

**जाहीर ई-निविदा सूचना क्र.३१/२०२६-२७**

कुळगांव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील पूर्व विभागातील रस्त्यावर पडलेले खड्डे वाहतुक सुरळीत करण्याच्या दृष्टीने खड्डे भरणे आवश्यक असल्या कारणाने मा. नगराध्यक्षा यांनी सर्वसाधारण सभेचा कुबनप हद्दीतील पश्चिम विभागातील रस्त्यावरील खड्डे बुजविणे असा ठराव करण्यात आला. सार्वजनिक बांधकाम दर सुचीनुसार प्राकलन तयार करुन त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून टक्केवारी दराच्या ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई-निविदा संच विक्री व स्विकृतीचा कालावधी दि.०९/०९/२०२६ ते दि. १७/०९/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत असून तसेच सदर ई - निविदा शक्य झाल्यास दि. १८/०९/२०२६ रोजी दुपारी ४.०० वा. नंतर उघडण्यात येतील. निविदेबाबतचा सविस्तर तपशील नगरपरिषदेच्या http://kbmc.gov.in तसेच शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर व नगरपरिषदेच्या सुचना फलकावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

**सही/-**
**(मारुती गायकवाड)**
मुख्याधिकारी
कुळगांव बदलापूर नगरपरिषद, कुळगांव

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की **मौजे भेरले,** तहसील-पनवेल, जिल्हा-रायगड येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे :-

**शेतजमीनीचे वर्णन**

**मौजे भेरले,** तहसील पनवेल, जिल्हा रायगड येथील मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र: लावणी लायक हे.आर.प्रती | क्षेत्र: पोटखराबा हे.आर.प्रती | क्षेत्र: एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| ७६/२ | ०.१४.६० | ०.०१.१० | ०.१५.७० | १.९४ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन **१४** दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०९/०९/२०२६

**सही/-**
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए.एल.एल.बी.

**कार्यालयीन पत्ता :** गाळा क्र. १५४ महानगरपालिका कॉम्प्लेक्स, तहसीलदार ऑफिसजवळ, दत्त झेरॉक्सच्या वरती, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६.
संपर्क:- ८८८८२७१७५९

### जाहीर नोटीस

सर्व तमाम जनतेस या जाहिर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, मौजे आदई, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत श्रीमती. चंद्राबाई रघुनाथ फडके यांचे मालकीची, ताबेकबजातील, वहिवाटीतील आहे. सदर मिळकत खरेदी करण्याबाबत आमचे आशिलांनी, श्रीमती. चंद्राबाई रघुनाथ फडके यांचेसोबत बोलणी सुरु केली आहे. व्यवहार अंतिमतः निश्चित ठरविण्यापुर्वी सदर मिळकतीचे स्वामीत्वाबाबत खात्री करणे जरुरी असल्याने सदर नोटीस देत आहोत.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे आदई, ता. पनवेल, जि. रायगड.**

| गट क्र./ सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर.पाँ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ८६ | १ / ब | ०-२२-५० पो.ख. ०-०१-८० **एकुण ०-२४-३०** | ३.९४ |

वरील मिळकतीमध्ये अगर सदर मिळकतीचे कोणत्याही भागावर कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा मालकीहक्क, ताबाकब्जा, गहाण, दान, बक्षीसपत्र, साठेकरार अगर अन्य कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी, हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून, २१ दिवसांच्या आंत त्यांची हरकत कागदोपत्री पुराव्यासहीत खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवाव्यात. मुदतीत हरकत न आल्यास, वरील मिळकत निर्वेध, विनाहरकत व बोजारहित आहे. असे समजुन आमचे आशिल सदर मिळकतीचा व्यवहार निश्चित ठरविण्याच्या अनुषंगाने पुढील चर्चा करुन निर्णय घेतील व मुदतीनंतर येणाया हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ८/०९/२०२६

**सही/-**
**ॲड. श्री. एकनाथ जी. खुटले**

कार्यालय : शॉप नं. १, पारस प्लाझा, गांवदेवी मंदिराजवळ, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६. मो.नं. ९८६७१३२०२२

### जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे करवले बुद्रुक, ता-पनवेल, जि-रायगड येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काची मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे :

**- मिळकतीचे वर्णन-**
**मौजे : करवले बुद्रुक, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड**

| गाव | भोगवटदारांचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आरपॉ. | आकाराणी रू.पै. |
|---|---|---|---|---|
| करवले बुद्रुक | १ काळुराम बाबु पाटील २ मुरलीधर बाबु पाटील सर्व राहणार- करवले बुद्रुक, ता. पनवेल, जि. रायगड | १५/४ | ०.५१.०० ०.२१.०० ०.७२.०० हे.आर.पॉ. **एकुण ०.७२.००** | १.१९ |

सदरहू जागा, जमिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करारमदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे.

जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या न येणाऱ्या कोणत्याही हरकती / तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ८/०९/२०२६

**सही/-**
**ॲड. सरिता महेन्द्र साखरे**

पत्ता : बन्सल असोसिएटस्, पहिला मजला, प्लॉट नं. ३०, सेक्टर १/२, रोड नं.४, नवीन पनवले, बालाजी मंदिराच्या समोर, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६.

### ग्रुप ग्रामपंचायत वावेघर

मु.वावेघर, पो. रसायनी, ता. पनवेल, जि. रायगड ४१० २०७

#### निविदा सूचना

ग्रुप ग्रामपंचायत वावेघर करीता ग्रामनिधी ग्रामपंचायत वावेघर स्तर अंतर्गत खालील कामाकरिता जास्तीत जास्त ठेकेदारांकडून लिफाफा पद्धतीने मोहोर बंद निविदा मागविण्यात येत आहे.

| अनु. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रु. रक्कम | काम पूर्ण करण्याची मुदत | निविदा सादर करण्याची अंतिम तारीख | निविदा उघडण्याची अंतिम तारीख अंतिम तारीख | इसारा रक्कम: वेळ | इसारा रक्कम: ठिकाण | इसारा रक्कम: इसारा | निधीचा प्रकार | निविदा फी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मदन जाधव ते विकी चव्हाण यांचे घरापर्यंत आरसीसी गटार करणे. (वावेघर अंतर्गत गटार करणे) | १,००,०००/- | ९० दिवस | २५/०९/२०२६ | २८/०९/२०२६ | सकाळी ११ वाजता | ग्रु.ग्रा. वावेघर कार्यालय | १% | ग्रामनिधी | १००/- |
| २ | संत सेवालाल महाराज मंदिर ते दिलीप चव्हाण यांचे घरापर्यंत गटार करणे. (वावेघर वसाहत अंतर्गत गटार करणे) | ५,००,०००/- | ९० दिवस | २५/०९/२०२६ | २८/०९/२०२६ | सकाळी ११ वाजता | ग्रु.ग्रा. वावेघर कार्यालय | १% | ग्रामनिधी | १००/- |
| ३ | ग्रुप ग्रामपंचायत वावेघरसाठी ब्लिचिंग पावडर खरेदी करणे. | ७०,०००/- | ६० दिवस | २५/०९/२०२६ | २८/०९/२०२६ | सकाळी ११ वाजता | ग्रु.ग्रा. वावेघर कार्यालय | १% | ग्रामनिधी | १००/- |
| ४ | ग्रुप ग्रामपंचायत वावेघरसाठी औषध व धुर फवारणी करणे. | ३०,०००/- | ६० दिवस | २५/०९/२०२६ | २८/०९/२०२६ | सकाळी ११ वाजता | ग्रु.ग्रा. वावेघर कार्यालय | १% | ग्रामनिधी | १००/- |
| ५ | ग्रुप ग्रामपंचायत वावेघर हद्दीत साफसफाई करणे. | १,००,०००/- | ९० दिवस | २५/०९/२०२६ | २८/०९/२०२६ | सकाळी ११ वाजता | ग्रु.ग्रा. वावेघर कार्यालय | १% | ग्रामनिधी | १००/- |

**अटी व शर्ती :**

१. प्राप्त निविदा / अर्ज २८/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वा ग्रामपंचायत कार्यालय वावेघर येथे उपस्थितांच्या समक्ष मा. सरपंच यांच्या हस्ते उघडणेत येईल.
२. कोणतेही एक अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार सरपंच ग्रामपंचायत वावेघर यांनी राखून ठेवला आहे.
३. प्रत्येक देयकातून शासन निर्णयाप्रमाणे रक्कम कपात केल्या जातील.
४. मा. उपअभियंता सो बांधकाम उपविभाग पनवेल, शाखा अभियंता पंचायत समिती पनवेल यांचेकडील तांत्रिक अधिकारी व ग्रामपंचायतीचे सदस्य यांचे मार्गदर्शनाखाली सदर काम करण्याचे असून काम समाधानकारक नसेल तर त्याच स्थितीत थांबून कार्यारंभ आदेश रद्द करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.
५. काम अंतिमरित्या पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्यानंतर कामाची स्थिती बघून कपात केलेली सुरक्षा अनामत रक्कम परत केली जाईल.

जावक क्र. २६२/२०२६-२७
दिनांक : ०८/०९/२०२६

**सही/-**
**श्रीम. विशाखा वासुदेव सोंडकर**
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत वावेघर
ता. पनवेल, जि. रायगड

**सही/-**
**गितांजली गुरुनाथ गाताडे**
सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत वावेघर
ता.पनवेल, जि. रायगड

### महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

मुदतवाढ सूचना क्र. २

**ई निविदा सूचना क्र.२३ /२०२६-२०२७ (मुंबई) करीता**

दिनांक ०९/०७/२०२६ रोजी दैनिक नवाकाळ, मुंबई, दैनिक हिंदूस्थान टाईम्स, मुंबई , दैनिक फ्रिप्रेस जरनल, मुंबई, दैनिक प्रातःकाल, मुंबई, दैनिक भास्कर, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड , दैनिक सागर, ठाणे या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामाकरीता ई निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्याबाबत व कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण / महामंडळाचा खुलासा उपलब्धतेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचेनांव | अंदाजितरक्कम |
|---|---|---|
| १ | रानसई पाणीपुरवठा योजना.. रानसई धरणाच्या ओव्हरफ्लो विभागाची विशेष दुरुस्ती करणे, ऊर्जा क्षय व्यवस्था, गाईड भिंत बांधणे, रानसई धरणाच्या ड्रेनेज पाइपलाइन स्थलांतरीत करणे व विस्तार करणे. | ₹ २४,८०,००,५०१.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक १८/०९/२०२६ पर्यंत शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक ११/०९/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

# हिवताप, डेंग्यूबाबत जनजागृती

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत श्रावणी सोमवारचे औचित्य साधून विविध शिवमंदिरांमध्ये ६० आरोग्यविषयक जनजागृती शिबिरांचे आयोजन करण्यात आले. श्रावण मासातील प्रत्येक सोमवारी शिवमंदिरांमध्ये आयोजित शिबिरांमधून भाविकांमध्ये हिवताप, डेंग्यू आजारांबाबत प्रात्यक्षिकांसह जनजागृती करण्यात आली. या ६० शिबिरांच्या ठिकाणी एकूण २० हजार ४४० भाविकांनी भेट दिली असून यामध्ये ७२६ रक्तनमुने घेण्यात आले.



हिवताप, डेंग्यूचा प्रसार रोखण्यासाठी नागरिकांना डासोत्पत्ती स्थानांची माहिती देण्यात आली व प्रतिबंधात्मक उपाययोजनांमध्ये नागरिकांचा प्रत्यक्ष सहभाग मिळविण्यात आला.हिवताप, डेंग्यूचा प्रसार अनुक्रमे ॲनोफिलीस व एडिस डासाची मादी घरातील व घराभोवती साचलेल्या स्वच्छ पाण्यात अंडी घालते आणि यातूनच डासाचा जन्म होतो. सदर डास हिवताप, डेंग्यू असलेल्या रुग्णाला चावल्यास त्याचे रक्त शोषून घेतो, तेव्हा डासाच्या शरीरात जंतू किंवा विषाणू जातात. तोच डास जेव्हा निरोगी व्यक्तीला चावतो, तेव्हा एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे डासामार्फत हिवताप, डेंग्यू आजाराचा प्रसार होतो, याची माहिती नागरिकांना देण्यात आली.

या शिबिरांमध्ये ॲनोफिलीस व एडिस डासांची उत्पत्तीस्थाने प्रत्यक्षात दाखवून, तसेच नागरिकांना डासांच्या आळ्या प्रत्यक्ष दाखवून घराभोवती व घरांतर्गत असणारी डासोत्पत्ती स्थाने, जसे की पाणी साठवून ठेवलेले ड्रम ओढणी, धोतर किंवा साडीच्या कपड्याने बंदिस्त करणे, त्याचबरोबर पाणी साठवण्याची भांडी व टाक्या बंदिस्त करणे व आठवड्यातून एक दिवस स्वच्छ करून कोरड्या करून ठेवणे, इतस्ततः पडलेले भंगार साहित्य व टायर्स नष्ट करणे, छतावरील प्लास्टिक शीट, ताडपत्री यामध्ये पाणी साचू न देणे व ताप येताच त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेणे याबाबत नागरिकांना माहिती देऊन याबाबत काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले.

महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे आरोग्य विभागाचा नियमित आढावा घेत असून आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील बांधकाम साइट्सवर बारकाईने लक्ष देण्यात येत आहे. नवी मुंबईतील सर्व बांधकाम व्यावसायिकांना आयुक्तांच्या स्वाक्षरीचे पत्र देण्यात आले असून त्यामध्ये सर्व बांधकाम व्यावसायिकांनी आपली बांधकाम साइट व मजूर वस्ती या ठिकाणी स्वच्छता राखणे, मजुरांच्या याद्या अद्ययावत करणे, यासाठी नोडल ऑफिसर नियुक्त करणे, नियमित पेस्ट कंट्रोल करणे आदी बाबींचे काटेकोरपणे पालन करण्याचे सूचित केले आहे.

या बाबींचे पालन होत असल्याची खातरजमा महापालिका आरोग्य विभागाची क्षेत्रीय पथके लक्ष ठेवून करीत आहेत. यामुळे बांधकाम स्थळांवरील डासोत्पत्ती स्थानांवर नियंत्रण मिळणे अधिक प्रभावी होत आहे.

# अडथळामुक्त पदपथ मोहिमेंतर्गत आयुक्त कैलास शिंदे स्वतः फिल्डवर

**नवी मुंबई : बातमीदार**

सर्वोच्च न्यायालयाने नुकत्याच दिलेल्या निर्णयानुसार अडथळामुक्त पदपथ हा नागरिकांचा अधिकार आहे. या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी विशेष बैठक आयोजित करीत सर्व विभागांमध्ये विशेष मोहीम हाती घेण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार सोमवारपासून सर्वच विभाग कार्यालयांमार्फत धडक मोहीम हाती घेण्यात आली.

विशेष म्हणजे आयुक्त कैलास शिंदे यांनी स्वतः फिल्डवर उतरत विभाग कार्यालयांमार्फत सुरू असलेल्या अडथळामुक्त पदपथ मोहिमेंतर्गत कारवाईची प्रत्यक्ष पाहणी केली. वाशी व नेरूळ येथील कारवाईप्रसंगी त्यांच्यासमवेत अतिरिक्त आयुक्त राहुल गेठे, अतिक्रमण विभागाचे उपआयुक्त संजय शिंदे, परिमंडळ १ चे उपआयुक्त अमोल पालवे, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त अजय गडदे तसेच सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी वाशी सुखदेव येडवे आणि नेरूळच्या अनुराधा बाबर उपस्थित होत्या.

आयुक्तांनी बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार अडथळामुक्त पदपथांतर्गत पदपथावर कोणत्याही स्वरूपात अधिकृत किंवा अनधिकृत अडथळा असायला नको, या अनुषंगाने पदपथावरील अधिकृत फेरीवाल्यांना पर्यायी जागा देणे तसेच पदपथावरील अनधिकृत फेरीवाल्यांना हटवणे अशा प्रकारच्या मोहिमेचे नियोजन करण्यात आले आहे.याकरिता प्रत्येक विभाग कार्यालयाने याबाबतचा कृती आराखडा तयार केला. त्यामध्ये रस्त्यांच्या बाजूच्या पदपथांचे सर्वेक्षण करण्यात आले. कारवाई कोणत्या पदपथांवर करायची याचा प्राधान्यक्रम ठरविण्यात आला.

त्याची आखणी करून कारवाईसाठी पथके तयार करण्यात आली व प्रत्यक्ष कारवाईला सुरुवात करण्यात आली. आयुक्तांनी वाशी सेक्टर ९ व १० तसेच नेरूळ सेक्टर २९ व सेक्टर ३ आणि सेक्टर ३० मधील मार्जिनल स्पेस व फेरीवाल्यांवरील कारवाईची पाहणी केली. विभाग कार्यालयांमार्फत सुरू असलेली ही कारवाई अशीच सुरू राहणार असून त्याचा प्रभाव कायम राखण्याच्या दृष्टीने त्यात सातत्य राखले जाणार आहे.

# सीवूड्समध्ये मुलांसाठी विशेष वर्षावास कार्यक्रम

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

बौद्धजन विकास संघ आणि बौद्धजन महिला विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. ६) सेक्टर ४८, सीवूड्स येथील लुम्बिनी बुद्ध विहारात मुलांसाठी आयोजित करण्यात आलेला विशेष वर्षावास कार्यक्रम अत्यंत उत्साहात आणि यशस्वीपणे संपन्न झाला. सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यांत चालणाऱ्या या विशेष संस्कारक्षम उपक्रमाच्या पहिल्या दिवशी नियोजित सर्व उपक्रमांची अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने अंमलबजावणी करण्यात आली.



उपस्थित सर्व मुले पांढऱ्या शुभ्र वस्त्रांमध्ये उपस्थित होती. या पहिल्या सत्रात मुलांना ध्यान साधना, बुद्ध वंदना, पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट, महापुरुषांचा परिचय, पाली भाषा आणि योगाभ्यास याचे अभ्यासपूर्ण धडे देण्यात आले. अनेक पालकांनी या प्रसंगी मुलांसाठी स्वेच्छेने फलहार दान करून उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवला.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बौद्धजन महिला विकास संस्थेच्या अध्यक्ष डॉ. ॲड. मिता गंगावणे, सेक्रेटरी रंजना कांबळे, खजिनदार दिपाली शिलेवंत आणि उपसचिव रेशमा तरकसे यांनी मुख्य जबाबदारी सांभाळली. तसेच संस्थेच्या सक्रिय सदस्या वर्षा झेंडे, बालिका तरकसे, ज्योती भालेराव, सुगंधा भालेराव, मालन बडवे, प्रीती जाधव, सुवर्णा उबाळे, दिपाली चौरे, शोभा गायकवाड, ॲड. पूजा तरकसे आणि वेदिका भालेराव यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाचे चोख व्यवस्थापन केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल बौद्धजन विकास संघाचे अध्यक्ष राम झेंडे आणि त्यांच्या संघातील सर्व सदस्यांचे आयोजकांतर्फे विशेष आभार मानण्यात आले. हा संपूर्ण कार्यक्रम सुरळीत पार पाडण्यासाठी मोलाचे सहकार्य व योगदान देणाऱ्या रोशनी पाटील यांचेही विशेष आभार मानण्यात आले.

येत्या ऑक्टोबर महिन्यापर्यंत दर रविवारी सकाळी ११ ते १२ या वेळेत हा उपक्रम लुम्बिनी बुद्ध विहारात असाच सुरू राहणार असून परिसरातील अधिकाधिक पालकांनी आपल्या मुलांना या संस्कार वर्गात पाठवावे, असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

# चिरनेरचे अजय मोकल आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित



**उरण : प्रतिनिधी**

उलवे नोड येथील सी. पी. गोइंका इंटरनॅशनल स्कूलचे कला शिक्षक अजय दामोदर मोकल यांना शैक्षणिक क्षेत्रातील चित्रकलेतील विशेष योगदानाबद्दल प्रतिष्ठित आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. नवी मुंबई आणि रायगड विद्यालय सर्वधनम २०२६ चा शैक्षणिक क्षेत्रातील चित्रकलेतील विशेष योगदानाबद्दलचा सर्वोत्कृष्ट आदर्श शिक्षक पुरस्कार शिक्षक दिनाचे औचित्य साधून त्यांना देण्यात आला.

एच. आर. संयुक्ता सिन्हा यांच्या हस्ते कला शिक्षक अजय मोकल यांना हा पुरस्कार समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला. शाळेच्या प्राचार्या डॉ. स्मिता गांधी यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसह विभागातील नागरिकांनी अजय मोकल यांचे अभिनंदन केले.



# अभिनेते विजय पाटकर यांचा सत्कार

**पनवेल : वार्ताहर**

श्रीक्षेत्र पळसदरी (पुण्यनगरी), कर्जत येथील अक्कलकोट श्री स्वामी समर्थ मठात प्रसिद्ध अभिनेते विजय पाटकर यांचा मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. मठातील आध्यात्मिक वातावरणात हा सत्कार सोहळा उत्साहात पार पडला.

यावेळी मठाचे अध्यक्ष विक्रांत दरेकर, ज्येष्ठ पत्रकार संजय कदम, दैनिक रायगड नगरीचे संपादक राकेश पितळे, दैनिक जनखुलासाचे प्रतिनिधी राजेंद्र पाटील, माने रिसॉर्टचे मल्हारी माने यांच्यासह स्वामी समर्थ मठातील स्वामीभक्त उपस्थित होते. विजय पाटकर यांच्या कलाक्षेत्रातील योगदानाबद्दल उपस्थित मान्यवरांनी त्यांचा सत्कार करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. मठातील धार्मिक व प्रसन्न वातावरणात झालेल्या कार्यक्रमामुळे उपस्थितांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

# डेरवली जि.प. शाळेत शिक्षक दिन, गोपाळकाला उत्साहात




**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील रायगड जिल्हा परिषदेच्या डेरवली शाळेत आनंददायी शनिवार अंतर्गत शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी सर्व शिक्षकांना शिक्षक दिनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. यावेळी इयत्ता चौथी व पाचवीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका साकारत लहान वर्गातील विद्यार्थ्यांसाठी विविध आनंददायी व शैक्षणिक कृती घेतल्या.

व्यायामाचे प्रकार, कविता, गाणी, गोष्टी, गणिती कृती आणि वाचन अशा उपक्रमांतून मोठ्या विद्यार्थ्यांनी लहानग्यांना आनंद दिला. श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या निमित्ताने सर्व विद्यार्थी राधा-कृष्ण व गोविंदा यांच्या वेशभूषेत शाळेत आले होते. सर्वांनी मिळून उत्साहात गोपाळकाला साजरा केला. पारंपरिक वेशभूषा, विविध कृती आणि सामूहिक सहभागामुळे शाळेचा परिसर आनंदाने आणि उत्साहाने भरून गेला. आनंदातून शिक्षण आणि कृतीतून अनुभव देणारा हा आनंददायी शनिवार विद्यार्थ्यांसाठी संस्मरणीय ठरला.

# कविता डॉट कॉमचा शंभरावा प्रयोग उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**

शिवतुतारी प्रतिष्ठान नवी मुंबई संचालित संवाद नात्यांचा कविता डॉट कॉम या साहित्य संस्थेचा चौथा वर्धापन दिवस आणि कविता डॉट कॉमचा शंभरावा प्रयोग मोठ्या दिमाखात राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यालय, रबाडा येथे संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नवी मुंबईचे माजी महापौर सुधाकर सोनवणे, तर प्रमुख पाहुणे म्हणून लोकशाहीर प्रा. डॉ. गणेश चंदनशिवे उपस्थित होते.




यावेळी आगरी कवी पुंडलिक म्हात्रे यांचा जीवन गौरव पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. पुंडलिक म्हात्रे यांनी आपल्या भाषणात आपली खदखद व्यक्त करताना येणाऱ्या दिवसांमध्ये मराठी माणूस मुंबईमध्ये उपरा होणार नाही ना, याची काळजी घ्या असा ज्येष्ठत्वाचा सल्ला दिला. आपली सुप्रसिद्ध आगरी कविता हरकत काय हाय तुमची ही कविता सादर करून रसिकांची दाद मिळवली. शिवतुतारी प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. रवींद्र पाटील यांनी आपल्या प्रास्ताविकात कविता डॉट कॉमला परदेशवारीची हाव नाही, याउलट गावागावांत कविता पोहोचणे महत्त्वाचे असल्याचे सांगितले. माजी महापौर सुधाकर सोनवणे यांनी आपल्या भाषणात शिक्षण व्यवस्था आणि शिक्षणाची अवस्था यावर प्रखर मत व्यक्त करत खरे शिक्षण घडून येण्यासाठी सर्व समाजातील तळागाळातील लोकांनी शिक्षणाचे मूळ जाणून घ्यावे असे प्रतिपादन केले.

लोकशाहीर गणेश चंदनशिवे यांनी लोकसाहित्य, लोकपरंपरा आणि आख्यान यांचे प्रकार सांगून जांभूळ आख्यानाबाबत समर्पक शब्दांत गुंफण करून लोकगीतांमधून देखील आपल्याला समर्थपणे कसे सामर्थ्यशाली समाजस्वास्थ्य घडवता येते हे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शंकर गोपाळे व नारायण लांडगे पाटील यांनी केले. यावेळी साहित्य मंदिर अध्यक्ष सुभाष कुळकर्णी, सुरेश शिंदे, विष्णू शिंदे, रवींद्र वाडकर, प्रभात ट्रस्टचे डॉ. प्रशांत थोरात, डॉ. वृषाली मगदूम, अशोक निकम, कवयित्री डॉ. शैलजा करोडे, रवींद्र औटी, विलास समेळ, रमेश संकपाळ यांच्यासह साहित्य रसिक उपस्थित होते.

# रिटघर विद्यालयात शिक्षक दिन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भैरवदेव विद्यालय व लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय, रिटघर येथे शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष एम. आर. म्हात्रे, विद्यालयाचे मुख्याध्यापक कारंडे आणि पर्यवेक्षिका बाबर तसेच विद्यालयातील सर्व शिक्षकांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन व विद्येची देवता सरस्वती यांच्या प्रतिमेचे पूजन केले. यानंतर इयत्ता १०वी बच्या विद्यार्थ्यांनी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच आजचे विद्यार्थी शिक्षक यांचा फूल व पेन देऊन सत्कार केला.



कार्यक्रमाचे सूत्रसंचालन १०वी बच्या विद्यार्थ्यांनी प्रणिता शेळके, आर्यन पार्टे यांनी केले. प्रास्ताविक एस. एस. पाटील यांनी केले. इयत्ता ५वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व सांगणारी भाषणे केली. तसेच आजचे एकदिवसीय विद्यार्थी, मुख्याध्यापक नवाब शेख, पर्यवेक्षिका प्रणिता शेळके तसेच इतर विद्यार्थी शिक्षक दक्षता भोपी यांनी आज आलेले अनुभव सांगितले. शिक्षकांचे भाषण अमित पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हात्रे यांनी आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे नियोजन इयत्ता १०वी बचे विद्यार्थी व वर्गशिक्षिका एस.एस. पाटील यांनी केले. शेवटी रिया बामुगडे या विद्यार्थिनीने उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रम संपन्न झाला.

# गव्हाण विद्यालयात आगळावेगळा शिक्षक दिन

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण-कोपर येथे शिक्षक दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. शिक्षक दिनाचे औचित्य साधून विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय विभागातील विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या विविध भूमिका साकारत प्रत्यक्ष अध्यापनाचा अनुभव घेतला.



या अभिनव उपक्रमामुळे शिक्षकांचे कार्य, जबाबदारी, अध्यापन कौशल्य आणि ज्ञानदानाचे महत्त्व त्यांना प्रत्यक्ष अनुभवता आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी भारताचे माजी राष्ट्रपती व थोर शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन तसेच रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थी-शिक्षकांनी आपापल्या जबाबदाऱ्या स्वीकारून शैक्षणिक कामकाजास सुरुवात केली. दहावीच्या शिक्षक झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये मुख्याध्यापकपदी प्रतीक्षा ज्ञानेश्वर कोळी, उपमुख्याध्यापकपदी अक्षरा घरत, तर पर्यवेक्षक म्हणून साईशा घोलप आणि आर्या प्रशांत कोळी यांनी कार्यभार सांभाळला.

अक्षरा कडू तसेच पी.टी. इन्चार्ज म्हणून आशुतोष साह आणि ग्रंथपाल म्हणून आदित्य कुराडे यांनी आपापल्या जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडल्या, तर ज्युनिअर कॉलेजमध्ये विभागप्रमुख कपिल सोनकांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. यावेळी अनिकेत कांताराम धोंगडे यांनी उपमुख्याध्यापक, तर आदित्य कांताराम धोंगडे यांनी पर्यवेक्षक म्हणून कार्यभार सांभाळला. इयत्ता पाचवी ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना विविध विषयांचे अध्यापन करताना विद्यार्थी-शिक्षकांनी फळ्यावर लेखन, विषयाचे स्पष्टीकरण, प्रश्नोत्तर, शंकानिरसन, वर्गशिस्त आणि वेळेचे नियोजन अशा शिक्षकांच्या विविध जबाबदाऱ्या पार पाडल्या.

प्रतीक्षा कोळी, अक्षरा घरत, साईशा घोलप, अक्षरा कडू, दुलारी राजपत, आर्या कोळी यांनी शिक्षकाची भूमिका साकारताना आलेले अनुभव याबाबत मनोगत व्यक्त केले. हर्षला पाटील, लाईफ वर्कर तथा ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे व उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे यांनी विद्यार्थी-शिक्षकांचे कौतुक केले. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीचा कार्यक्रम वर्गशिक्षिका सारिका ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा केला. सूत्रसंचालन साक्षी जोंधळेने केले, तर कुमारी आर्या कडूने आभारप्रदर्शन केले. कार्यक्रमास रयतचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रवींद्र भोईर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, हर्षला पाटील, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे तसेच विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय विभागातील शिक्षकवृंद उपस्थित होते. उपक्रमाचे नियोजन संदीप भोईर, वर्गशिक्षक प्रशांत परदेशी, गीतांजली म्हात्रे, चारुशीला ठाकूर, शितलकुमार म्हात्रे तसेच विभागप्रमुख प्रा. संजय उगले व प्रा. करुणा तांडेल यांनी केले.




**पनवेल : येथील वडाळे तलावातील जायंट साल्वीनिया या जलपर्णीच्या अनिर्बंध वाढीवर उपाययोजनांसाठी आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीला महापौर नितीन पाटील, आयुक्त मंगेश चितळे, सभागृहनेते ॲड. प्रकाश बिनेदार, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर उपस्थित होते.**

# रायगडातील २८ धरणक्षेत्रांत ९६.५१ टक्के पाणीसाठा

**रोहा : प्रतिनिधी**

यंदा पावसाला उशिरा सुरुवात झाली, परंतु नंतर जुलैमध्ये चांगला पाऊस पडल्यामुळे रायगड जिल्ह्यातील धरण क्षेत्रात मुबलक पाणीसाठा उपलब्ध आहे. अद्याप पाऊस चालू असल्यामुळे बहुतांशी धरणे ही भरलेलीच आहेत. जिल्ह्यातील २८ धरणक्षेत्रात ९६.५१ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. प्रामुख्याने १९ धरणक्षेत्रात १०० टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.

याशिवाय सहा धरणक्षेत्रात ९९ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. उर्वरित श्रीवर्धन तालुक्यातील कार्ले धरणक्षेत्रात ६३ टक्के आणि रानिवलीत ५३ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. गेल्या वर्षी



जिल्ह्यातील याच वेळी ७५.१० टक्के पाणीसाठा उपलब्ध होता. त्यामुळे यंदा पाणीसाठा अधिकचा उपलब्ध आहे.

रायगड पाटबंधारे विभाग कोलाड अंतर्गत येत असलेल्या जिल्ह्यातील २८ धरण क्षेत्रातील पाणीसाठा पाहता यामध्ये प्रामुख्याने मुरूड तालुक्यातील फणसाड १०० टक्के; तळा तालुक्यातील वावा १०० टक्के; रोहा तालुक्यातील सुतारवाडी १०० टक्के; सुधागड तालुक्यातील कोंडगाव १०० टक्के, घोटवडे १०० टक्के, ढोकशेत १०० टक्के, कवेळे १०० टक्के, उन्हेरे १०० टक्के; श्रीवर्धन तालुक्यातील कुडकी १०० टक्क; म्हसळा तालुक्यातील पाभरे १०० टक्के, संदेरी १०० टक्के; महाड तालुक्यातील वरंध १०० टक्के, खिंडवाडी १०० टक्के, कोथुर्डे १०० टक्के, खैरे १०० टक्के; खालापूर तालुक्यातील भिलवले १०० टक्के, कलोते मोकाशी १०० टक्के, डोणवत १०० टक्के; पनवेल तालुक्यातील मोर्बे धरणात १०० टक्के पाणीसाठा आहे.

अलिबाग तालुक्यातील श्रीगाव ९९ टक्के; पेण तालुक्यातील आंबेघर ९५ टक्के; श्रीवर्धन तालुक्यातील कार्ले ६३ टक्के, रानिवली ५३ टक्के; कर्जत तालुक्यातील साळोखे ९९ टक्के, अवसरे ९९ टक्के; पनवेल तालुक्यातील बामणोली ९९ टक्के, उसरण ९९ टक्के आणि उरण तालुक्यातील पुनाडे ९९ टक्के एवढा पाणीसाठा उपलब्ध आहे.

# नागोठण्यात शांतता समितीची बैठक

## गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांकडून विविध सूचना



**नागोठणे : बातमीदार**

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागोठणे पोलीस ठाणे हद्दीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, गणेशोत्सव शांततेत व उत्साहात पार पडावा यासाठी नागोठणे पोलिसांनी कंबर कसली आहे. गणेशोत्सव काळात स्पीकर अथवा डीजेचा आवाज ७५ डेसिबलपेक्षा जास्त असता कामा नये, नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधित साहित्य जमा करून स्पीकर व डीजे मालकांवर गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशारा नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक निरीक्षक रवींद्र पारखे यांनी दिला.

नागोठणे पोलीस ठाण्यात सोमवारी (दि. ७) शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस रोहा उपविभागीय पोलीस अधिकारी प्रसाद गोकुळे, कर्मचारी स्वप्नील भालेराव, शिवसेनेचे ज्येष्ठ नेते कृष्णाजी धामणे, उपसरपंच ज्ञानेश्वर साळुंखे, बाळू रटाटे, धनंजय जगताप, बाजारपेठ गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष अंकुश जैन, शंकर भालेकर, बाबा मुल्ला, विकास जाधव, विजय पाटील, काशिनाथ शिद, महिला दक्षता समिती सदस्य शबाना मुल्ला, अपर्णा सुटे, संगीता पोलसानी यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र पारखे पुढे म्हणाले की, गणेशोत्सव काळात पैसे लावून जुगार अथवा पत्ते खेळताना आढळल्यास थेट गुन्हे दाखल करण्यात येतील. म्हणून पैसे लावून पत्ते खेळण्यापेक्षा कॅरम, बुद्धिबळ यांसारखे मनोरंजनात्मक खेळ खेळा. सोशल मीडियाचा गैरवापर करू नये. कोणत्याही समाजाच्या भावना दुखावतील असे आक्षेपार्ह देखावे, पोस्ट अथवा मजकूर प्रसारित करू नये. गणेशोत्सव मंडळांनी सामाजिक सलोखा व शांतता अबाधित ठेवण्यास सहकार्य करावे.

गणेशोत्सवाच्या काळात वाहतूक वाढण्याची शक्यता लक्षात घेता नागोठणे हद्दीतील महामार्गावर खड्डे गणेशोत्सवापूर्वी बुजवून रस्ता सुस्थितीत करण्याच्या सूचना महामार्ग ठेकेदाराला देण्यात आल्या आहेत तसेच वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी पर्यायी मार्गांचा वापर करण्यात येणार असून हे पर्यायी मार्गही सुस्थितीत ठेवावेत, अशा सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाला देण्यात आल्याचे पारखे यांनी सांगितले.

गणेशमूर्ती विसर्जनाच्या ठिकाणी नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना व चोख व्यवस्था ठेवण्यात यावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. दरम्यान यावेळी पोलीस उपविभागीय अधिकारी प्रसाद गोकुळे यांनीही मार्गदर्शन केले.

# खोपोलीत बँकेच्या वर्धापन दिनानिमित्त शिक्षकांचा सत्कार

**खोपोली : प्रतिनिधी**

डोंबिवली नागरी सहकारी बँकेचा ५६वा वर्धापन दिन खोपोली शाखेत उत्साहात साजरा झाला. यानिमित्ताने खोपोली परिसरातील शिक्षकांचा बँकेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

ब्राह्मण सभेचे अध्यक्ष राजेंद्र पेठे, ज्येष्ठ नागरिक संघाचे कार्यवाह नरेंद्र हर्डीकर, शाखा व्यवस्थापक पुष्पराज शेट्टी यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने कार्यक्रमास सुरुवात झाली. प्रमुख पाहुणे नितीन भावे



यांनी बँकेच्या खोपोली शाखेने गेल्या १७ वर्षांमध्ये उल्लेखनीय कामे केल्याचे सांगितले.

बँकेत येणाऱ्या विविध क्षेत्रातील मान्यवरांचे स्वागत शाखा व्यवस्थापक पुष्पराज स्वामी यांनी केले. वर्धापन दिनाच्या निमित्ताने बँकेचा व्यवसाय वृद्धीगत व्हावा यासाठी जास्तीत जास्त ग्राहकांपर्यंत पोहोचणार असल्याचे त्यांनी सांगितले. राजेंद्र पेठे, नरेंद्र हर्डीकर यांनीही आपले विचार व्यक्त केले.

कार्यक्रमास ज्येष्ठ पत्रकार जयवंत माडपे, कोमसाप खोपोली शाखेचे अध्यक्ष प्रकाश राजोपाध्ये, सुधाकर भट, अंबादास पाठक, सहव्यवस्थापक विक्रम मुंडिक, सुभाष पाटील, मंदार मुळे, सतीश बिचारे, सागर भोटे, दत्तात्रय साखरे आदी उपस्थित होते.

# माथेरान सह्याद्री मित्र आपत्कालीन संस्थेचा सन्मान

**माथेरान : प्रतिनिधी**

रायगड पोलीस आयोजित रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत पार पडलेल्या जीवनदूत सन्मान सोहळ्यात सह्याद्री मित्र आपात्कालीन सामाजिक संस्था माथेरानचा पालकमंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमास जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा परिषदेच्या सीईओ नेहा भोसले, जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल आदी उपस्थित होते.

माथेरान सह्याद्री मित्र आपात्कालीन सामाजिक संस्था मागील अनेक वर्षांपासून माथेरानमध्ये कार्यरत असून येथील डोंगदाऱ्यांमध्ये अपघात घडल्यास ही मंडळी सदैव तत्पर राहून आपले कार्य करीत असतात.



अपघातग्रस्तांना मदतीचा हात देणे, संकटात सापडलेल्यांचे प्राण वाचवणे आणि समाजाच्या सुरक्षिततेसाठी सदैव तत्पर राहण्याचे काम ही संस्था जबाबदारीने करीत असते.

दरम्यान, हा सन्मान केवळ आमचा नाही तर प्रत्येक त्या रेस्क्यू योद्ध्याचा आहे, जो स्वतःचा जीव धोक्यात टाकून दुसऱ्याचा जीव वाचवतो, असे उदगार संस्थेच्या कार्यकर्त्यांनी सत्कारावेळी काढले.

यावेळी माथेरान सह्याद्री मित्र आपात्कालीन सामाजिक संस्थेचे वैभव नाईक, सुनील ढोले, चेतन कळंबे, महेश काळे, सुनील कोळी, संदीप कोळी, उमेश मोरे उपस्थित होते. पुरस्काराबद्दल संस्थेचे अभिनंदन होत आहे.

# श्रीवर्धनमधील मराठा भवनाच्या कामाचे भूमिपूजन

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

क्षत्रिय मराठा समाज श्रीवर्धन–म्हसळा यांच्या वतीने उभारण्यात येत असलेल्या श्रीवर्धन मराठा भवनच्या उर्वरित कामाचे भूमिपूजन नुकतेच खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी मराठा भवन ही वास्तू भविष्यात केवळ एक इमारत न राहता संपूर्ण समाजाला दिशा दर्शविणारा दीपस्तंभ ठरेल, असे प्रतिपादन केले.

यावेळी व्यासपीठावर क्षत्रिय मराठा समाज श्रीवर्धन–म्हसळा अध्यक्ष वसंत यादव, मुंबई मंडळाचे अध्यक्ष किशोर राऊत यांच्यासह समाजातील पदाधिकारी, कार्यकर्ते, ज्येष्ठ



समाजबांधव आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

खासदार सुनील तटकरे म्हणाले की, मराठा भवन वास्तूच्या उभारणीसाठी समाजबांधवांनी घेतलेले परिश्रम आणि एकजुटीने केलेले प्रयत्न कौतुकास्पद आहेत. उर्वरित कामासाठी आवश्यक असणारा निधी आणि सर्वतोपरी सहकार्य उपलब्ध करून देण्यात येईल. या भवनाचा उपयोग भविष्यात केवळ सामाजिक कार्यक्रमांसाठी न होता तरुण पिढीच्या शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सामाजिक जडणघडणीसाठी व्हावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

येत्या १ डिसेंबरपूर्वी मराठा भवन पूर्ण क्षमतेने उभे राहून समाजाच्या सेवेत दाखल व्हावे यासाठी सर्व संबंधितांनी नियोजनबद्ध पद्धतीने काम पूर्ण करण्याचे आवाहन त्यांनी केले.

सुजित तांदळेकर यांनी प्रास्ताविकातून मराठा भवन उभारणीमागील भूमिका आणि समाजबांधवांच्या योगदानाचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष सापते यांनी केले, तर किशोर राऊत यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# शिवसेनेचे मारूती खेडकर राष्ट्रवादीत



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्याच्या आंबिवली भागातील शिवसेना पक्षाचे कार्यकर्ते मारूती खेडेकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. टेंबरे ग्रामपंचायतीमधील जुने शिवसैनिक म्हणून खेडेकर ओळखले जातात.

कर्जत येथील राष्ट्रवादी भवन कार्यालयात पक्षाचे तालुकाध्यक्ष दीपक श्रीखंडे आणि उपाध्यक्ष मधुकर घारे यांच्या उपस्थितीत शिवसेनेच्या खेडकर यांनी पक्षप्रवेश केला. या कार्यक्रमास प्रमोद पिंगळे, युवराज सावंत आदी उपस्थित होते.

# चित्रकार पराग बोरसे यांच्या कलाकारीचे अभिनेता वैभव मांगलेंकडून कौतुक

**कर्जत : प्रतिनिधी**

मराठी रंगभूमी आणि चित्रपट अभिनेते वैभव मांगले यांचे चित्रावरील प्रेम त्यांना कर्जत येथे खेचून आणायला भाग पडले. आंतराष्ट्रीय दर्जाचे चित्रकार पराग बोरसे यांच्याकडील विविध चित्र पाहण्यासाठी मांगले हे कर्जत येथे आले होते. तब्बल दोन तास व्यतीत करून चित्रकलेचा आस्वाद घेतला.

आपल्या व्यस्त वेळापत्रक यातून वेळ काढत अभिनेता वैभव मांगले यांनी कर्जत शहरातील दहिवली येथील चित्रकार पराग



बोरसे यांच्या स्टुडिओस भेट दिली. यावेळी त्यांनी सांगितले की, मला कलाकारांना भेटायला आवडते आणि मी त्यांची कामे समजून घेत असतो. सृजनाचं काही गणित कळतं का पाहतो. आपल्या कलेला त्याचा काही फायदा होतो का ते पाहतो. मला वाटतं कलाकार असणं ही भाग्याचीच गोष्ट आहे, पण त्याहीपेक्षा कलाग्रही, कलासक्त, सगळ्या कलांचा रसास्वाद घेणारा रसिक आपण असणं ही परमभाग्याची गोष्ट आहे. सुजाण रसिक असणे ही बाब तुमचे आयुष्य सुंदर करते.

पराग बोरसेची कलाकारी भारीच आहे आणि त्यामुळे आपले मन त्याच्या चित्राकडे ओढले जाते, असे सांगून अभिनेते मांगले यांनी बोरसे यांच्या कर्जत येथील घरी आणि नंतर स्टूडियोमध्ये खूप गप्पा मारल्या.

# गुणवंत काव्या गाडगेचा सन्मान

**चौक : प्रतिनिधी**

प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये विशेष प्राविण्य मिळवल्याबद्दल काव्या अनिल गाडगे हिचा नुकताच खालापूर पंचायत समितीचे सभापती कृष्णा पारंगे यांनी सन्मान केला.

चौक येथील प्राथमिक विद्यामंदिरमध्ये इयत्ता चौथीत शिकणारी काव्या गाडगे हिने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्यामार्फत आयोजित करण्यात आलेल्या प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवले आहे. तिने रायगड जिल्ह्यात प्रथम, तर महाराष्ट्र राज्य गुणवत्ता यादीत



ग्रामीण भागात सातवा क्रमांक प्राप्त केला आहे.

यासाठी आपल्या आई–वडिलांचे मार्गदर्शन लाभल्याचे सांगून भविष्यात प्रशासकीय अधिकारी होण्याची इच्छा काव्याने व्यक्त केली आहे. यावेळी जिल्हा परिषद सदस्य रेश्मा पाटील, कमल भस्मा उपस्थित होते.

# रोह्यात आर्टिफिशियल फ्लॉवर मेकिंग, मॅट रांगोळी प्रशिक्षण; प्रमाणपत्र वितरण

**रोहा : प्रतिनिधी**

राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली रोहा–अष्टमी नगर परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत गणेशोत्सवानिमित्त आर्टिफिशियल फ्लॉवर मेकिंग आणि मॅट रांगोळी प्रशिक्षण नुकतेच आयोजित करण्यात आले होते. या उपक्रमात ३५० महिलांचा सहभाग लाभला.

नगराध्यक्ष वनश्री शेडगे व त्यांची टीमने हा उपक्रम राबवला. प्रशिक्षणादरम्यान महिलांनी तयार केलेल्या विविध आकर्षक वस्तूंचे प्रदर्शन व विक्री महोत्सव ६




सप्टेंबर रोजी डॉ. सी. डी. देशमुख शहर सभागृह येथे झाला.

सभापती नीता हजारे व उपसभापती गौरी बारटक्के यांच्या नेतृत्वाखाली महिला व बालकल्याण समिती सदस्य स्नेहा आंब्रे, प्रियांका धनावडे, फराह पानसारे तसेच नगरसेविका पूर्वा मोहिते, आफरीन रोगे, संजना शिंदे, अल्मास मुमेरे व सुप्रिया जाधव यांच्या सहाय्याने हा उपक्रम यशस्वी करण्यात आला. या उपक्रमास सर्व नगरसेवकांचेही मोलाचे सहकार्य लाभले.

# सुनील कोठारी सचिवपदी

**रोहा : प्रतिनिधी**



जैन ओसवाल संघाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत रोहा जैन ओसवाल मूर्ती पूजक संघाच्या सचिवपदी सुनील कोठारी यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

मंत्री आदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे, माजी अध्यक्ष दिलीप सोलंकी, सभापती मयुर दिवेकर, रवी चाळके, नगरसेवक अजित मोरे, किराणा माल असोसिएशनचे अध्यक्ष विलास गुजर, जैन ओसवाल मूर्ती पूजक संघाचे आजी माजी पदाधिकारी, समाज बांधव यांनी त्यांचे अभिनंदन केले.



**मुरूड : चांद्रसेनीय कायस्थ प्रभू समाज व देवस्थान ट्रस्ट गुरव पाखाडी येथील शिवमंदिरात श्रावण महिन्यातील शेवटच्या सोमवारी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. हर हर महादेव, ॐ नमः शिवायच्या जयघोषाने मंदिर परिसर भक्तिमय झाल्याचे दिसून आले.**


# नमन धीरचे वादळी शतक

## टी-२० लीगमध्ये १७३ धावांची खेळी

**मोहाली : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्सकडून खेळणाऱ्या नमन धीरने शेर-ए-पंजाब टी-२० लीगमध्ये वादळी खेळीसह सर्वांचे लक्ष वेधून घेतलं आहे. या पठ्ठ्याने अमृतसर सूरमा संघाकडून खेळताना अवघ्या ६४ चेंडूत १७३ धावांची खेळी साकारली. या खेळीदरम्यान त्याने १६ चौकार आणि १२ गगनचुंबी षटकार ठोकले.

शेर-ए-पंजाब टी-२० स्पर्धेत टीम इंडिया आणि आयपीएल स्टार मैदानात उतरले आहेत. मंगळवारी अमृतसर सूरमा आणि मोहाली किंग्स यांच्यात सामना झाला. अमृतसर संघ प्रथम फलंदाजीसाठी उतरला. सलामीवीर सहज धवन अवघ्या एका धावेवर बाद झाल्याने संघाला लवकर पहिला धक्का बसला, मात्र दुसऱ्या बाजूला नमन धीरने आक्रमक फलंदाजी सुरू ठेवली. तिसऱ्या क्रमांकावर आलेला राहुल कुमारही केवळ १३ धावा करून माघारी परतला. जश्नप्रीत



सिंहने ४१ धावांची खेळी केली. त्यानंतर नमनने आपला आक्रमक अंदाज आणखी वाढवला आणि गोलंदाजांची अक्षरशः धुलाई केली.

नमनने अवघ्या ६४ चेंडूत १७३ धावा कुटल्या. १६ चौकार आणि १२ षटकारांच्या खेळीत त्याने तब्बल २७०.३१ च्या स्ट्राईक रेटसह या धावा काढल्या. विशेष म्हणजे नमनने केवळ ३७ चेंडूत आपले शतक पूर्ण केले. डावातील १२व्या षटक सुरू असताना त्याने शतकाला गवसणी घातली. त्यानंतरही तो थांबला नाही आणि अखेरपर्यंत धडाकेबाज फलंदाजी करत राहिला.

### मुंबई इंडियन्सचा भाग

*नमन धीर हा पंजाबचा असून आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्सकडून खेळतो. त्याने २०२४ मध्ये आयपीएलमध्ये पदार्पण केले. त्यावेळी त्याला केवळ सात सामने खेळण्याची संधी मिळाली. यानंतर २०२५ आणि २०२६मध्येही तो मुंबई इंडियन्सकडून खेळताना दिसला. आतापर्यंत आयपीएलमध्ये त्याने ३७ सामन्यांत ७१० धावा केल्या आहेत. यात तीन अर्धशतकांचा समावेश आहे.*

# दुलीप ट्रॉफी फायनलमधून वगळलेल्या करूण नायरचे स्थानिक स्पर्धेत शतक

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

सध्या दुलीप करंडक २०२६चा अंतिम सामना ईस्ट झोन आणि साऊथ झोन या संघांमध्ये खेळवला जात आहे. अंतिम सामन्यात ईस्ट झोनच्या संघाने प्रथम फलंदाजी करताना ७०८ धावांचा डोंगर उभारला आहे. आता साऊथ झोन संघाला सामन्यात टिकून राहायचे असेल, तर धावांचा पाऊस पाडावा लागेल. यादरम्यानच साऊथ झोन संघातून वगळलेल्या करूण नायरने मात्र दुसऱ्या स्पर्धेत सहभागी होत शतकी खेळी साकारली आहे.

बंगळुरूत झालेल्या डॉ.के. थिमप्पिया मेमोरियल स्पर्धेत छत्तीसगडविरुद्ध केएससीए सेक्रेटरीज इलेव्हनतर्फे करूण नायर शतकी खेळी साकारली. एम. चिन्नास्वामी स्टेडियममध्ये करुणने १८३ चेंडूंत १०४ धावांची खेळी केली. या खेळीत १२ चौकार



आणि एका षटकाराचा समावेश होता, मात्र उत्कृष्ट फॉर्ममध्ये असूनही ईस्ट झोनविरुद्ध सुरू असलेल्या दुलीप करंडक स्पर्धेच्या अंतिम सामन्यासाठी साउथ झोनच्या संघात त्याला स्थान मिळाले नाही.

साउथ झोनचे प्रशिक्षक विक्रम वर्मा म्हणाले, संघाच्या हितासाठी जे सर्वोत्तम होते, त्यावर आम्ही लक्ष केंद्रित केले. आता देवदत्त पडिक्कल परतल्यामुळे संघ-रचनेचा प्रश्न निर्माण झाला आहे. करुणला संघाबाहेर ठेवणे खूप कठीण आहे, पण सध्या आमच्याकडे कॉम्बिनेशनसाठी हाच पर्याय आहे.

### 'त्या' कारणावरून चर्चा

साउथ झोनचे प्रशिक्षक विक्रम वर्मा यांनी करुणच्या अनुपस्थितीचे कारण "वैयक्तिक कारण" असल्याचे सांगितले. ते म्हणाले, "तो वैयक्तिक कारणांमुळे घरी परतला आहे. त्याने आम्हाला ई-मेल करून कौटुंबिक कारणास्तव प्रवास करण्याची परवानगी मागितली होती. दुसरीकडे आपल्या शहरात आयोजित स्पर्धेत करुणने घेतलेला सहभाग हे दर्शवतो की, त्याच्या अनुपस्थितीमागे केवळ 'वैयक्तिक कारण' हेच एकमेव कारण नव्हते. आता साऊथ झोन संघाला त्याच्या संघातील अनुपस्थितीचा किती फटका बसणार हे पाहणे उत्सुकतेचे ठरेल.

# आधी गिलची फटकेबाजी, मग अभिषेकने केली भरपाई!



**मोहाली : वृत्तसंस्था**

शुबमन गिल आणि अभिषेक शर्मा हे बालपणापासूनचे चांगले मित्र आहेत. पंजाबकडून अंडर-१४ क्रिकेटपासून ते अगदी टीम इंडियासाठी डावाची सुरुवात करण्यापर्यंत दोघांनी अनेक सामने एकत्र खेळले आहेत, पण आयपीएलनंतर आता शेर-ए-पंजाब टी-२० लीगमध्ये या दोघांमध्ये 'दोस्तीत कुस्ती' पाहायला मिळाली.

मोहालीत शेर-ए-पंजाब टी-२० लीगमध्ये झालेल्या लढतीत फझिल्का फाल्कन्स आणि अमृतसर सूरमाज संघ आमनेसामने आले आणि गिल आणि अभिषेक हे दोन्ही जुने सहकारी एकमेकांविरुद्ध खेळताना दिसले. डावखुरा फिरकीपटू अभिषेक १०व्या षटकात गोलंदाजीसाठी आला. षटकातील पहिल्याच चेंडूवर गिलने षटकार मारत त्याचे स्वागत केले. त्यानंतर डीप मिड-विकेटच्या दिशेने चौकार आणि पाचव्या चेंडूवर पुन्हा षटकार ठोकला. षटकातील अखेरच्या चेंडूवर गिलने पुन्हा मोठा फटका खेळण्याचा प्रयत्न केला, पण यावेळी नमन धीरने त्याचा झेल टिपला अन् गिलच्या खेळीला ३५ चेंडूंत ६७ धावांवर ब्रेक लागला. या खेळीत आठ चौकार आणि तीन षटकारांचा समावेश होता. गिलच्या अर्धशतकीच्या जोरावर फझिल्का फाल्कन्सने निर्धारित २० षटकात ६ बाद १९१ धावा केल्या.

अभिषेकने गोलंदाजीत दोन विकेट्स घेतल्यावर फलंदाजीवेळी तुफान फटकेबाजी करत संघाला दमदार सुरुवात करून दिली. त्याचे अर्धशतक अवघ्या एका धावेने हुकले. योगायोग म्हणजे त्याचा ४९ धावांवर गिलनेच झेल टिपला, पण बाद होण्याआधी अभिषेकने १५ चेंडूंत ४९ धावांची वादळी खेळी करत संघाच्या विजयाचा भक्कम पाया रचला. या जोरावर अमृतसर सूरमाजने चार विकेट्स राखून आणि चार चेंडू शिल्लक ठेवत विजय मिळवला.

# पीटरसन आता मेंटॉर

**लंडन : वृत्तसंस्था**

इंग्लंड क्रिकेटमध्ये केविन पीटरसनची तब्बल १२ वर्षांनंतर पुन्हा एन्ट्री झाली आहे. इंग्लंड क्रिकेट बोर्डाने पीटरसनला वनडे आणि टी-२० संघाचा स्पेशल मेंटॉर म्हणून जोडण्याचा निर्णय घेतला आहे. २०२७च्या वनडे वर्ल्डकपच्या तयारीसाठी पीटरसनची ही भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

पीटरसनने २०१४मध्ये इंग्लंडकडून अखेरचा आंतरराष्ट्रीय सामना खेळला होता. आता तो ब्रेंडन मॅक्युलमच्या कोचिंग स्टाफमध्ये सहभागी होणार असून पुढील १२ महिने संघासोबत काम करेल. दक्षिण आफ्रिका, झिम्बाब्वे आणि नामिबिया येथे होणाऱ्या २०२७ वनडे वर्ल्डकपच्या तयारीसाठी पीटरसन संघाला मार्गदर्शन करणार आहेत.

# 'बेबी बॉस' वैभव सूर्यवंशीचा कॅप्टन्सीतही रुबाब!

**चेन्नई : वृत्तसंस्था**

चेन्नईतील चेपॉकच्या मैदानावर दक्षिण विभागाविरुद्धच्या सामन्यात वैभव सूर्यवंशी पुन्हा एकदा पूर्व विभागाचे नेतृत्व करताना दिसला. लंचपूर्वी कर्णधार इशान किशन मैदानाबाहेर गेल्यानंतर कार्यवाहक कर्णधार म्हणून वैभवच्या नेतृत्वाची झलक पाहायला मिळाली.

ईशान मैदानाबाहेर जाताच कॅप्टन्सीची जबाबदारी वैभवच्या खांद्यावर आली. त्यानंतर त्याने स्वतः गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. सगळी तयारी झाल्यानंतर मात्र वैभवने स्वतःला रोखले. त्यानंतर सीमारेषेवर उभ्या असलेल्या मोहम्मद शमीकडे पाहत त्याने हातवारे करत "किती ओव्हर



करणार? दोन की तीन?" असा सवाल केला. वैभवच्या या अंदाजामुळे त्याची मैदानावरील नेतृत्वशैली आणि खेळाडूंच्या वापराबाबतची समज पुन्हा एकदा चर्चेत आली.

चहापानाआधी मोहम्मद शमीकडून किमान दोन षटके टाकून घेण्याचा प्लॅन बेबी बॉस वैभव सूर्यवंशीने आखला. विशेष म्हणजे, वैभवचा हा डाव यशस्वीही ठरला. अनुभवी शमीने नव्या स्पेलमधील पहिल्याच षटकात दक्षिण विभागाला पाचवा धक्का दिला. चहापानाआधी शमीला आणखी एक षटक देता यावे यासाठी त्यानंतर वैभव स्वतः गोलंदाजीला आला. दक्षिण विभागाच्या डावातील ५५व्या षटकात त्याने केवळ एक धाव दिली आणि फायनलमधील आपले पहिले षटक अतिशय वेगाने पूर्ण केले.

वैभवचा हा डाव पुन्हा यशस्वी ठरला आणि शमीकडून दुसरे षटकही टाकून घेण्यात त्याला यश आले. म्हणजेच, कॅप्टन्सीची जबाबदारी मिळताच वैभवने केवळ नेतृत्वच केले नाही, तर गोलंदाजांचा योग्य वापर करत आपली रणनीतीही दाखवून दिली.

### रिव्ह्यूचा निर्णय ठरला यशस्वी

*मोठ्या धावसंख्येचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरलेल्या दक्षिण विभागाची सुरुवात अडखळती झाली. दक्षिण विभागाच्या डावातील सहाव्या षटकात मुकेश कुमारच्या गोलंदाजीवर रिकी भुईच्या बॅटची कड लागून चेंडू यष्टीरक्षक कुमार कुशाग्राकडे गेला. मात्र मैदानावरील पंचांनी अपीलाला फारसा प्रतिसाद दिला नाही. कुशाग्र आणि स्लिपमध्ये उभ्या असलेल्या वैभवलाही चेंडूला बॅटची कड लागल्याचा आवाज ऐकू आला होता. वैभवने कर्णधार ईशान किशनला डीआरएस घेण्याचा आग्रह केला. ईशाननेही त्याचे एकले अन् रिव्ह्यू घेतला, जो यशस्वी ठरला.*

# सचिन तेंडुलकरने लोणावळ्यात खरेदी केली ३.८६ एकर जमीन

**पुणे : प्रतिनिधी**

क्रिकेटच्या मैदानावर आपल्या फलंदाजीने विक्रमांचे डोंगर उभारणाऱ्या मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर याने आता रिअल इस्टेटमध्ये तब्बल ₹७० कोटींची मोठी गुंतवणूक केली आहे. सचिनने महाराष्ट्रातील प्रसिद्ध हिल स्टेशन असलेल्या लोणावळ्यात सुमारे ३.८६ एकर जमीन खरेदी केली आहे. मालमत्ता नोंदणीशी संबंधित कागदपत्रांनुसार हा व्यवहार ४ सप्टेंबर रोजी तीन स्वतंत्र कन्व्हेयन्स डीडद्वारे नोंदवण्यात आला.



या व्यवहारांची एकत्रित किंमत सुमारे ₹६९.९९ कोटी आहे. एकूण जमीन सुमारे १५,६०१.७८ चौरस मीटर म्हणजेच जवळपास १.६८ लाख चौरस फूट किंवा ३.८६ एकर इतकी आहे. ही मालमत्ता लोणावळ्याच्या मावळ तालुक्यातील एच वॉर्डमधील चार सिटी सर्व्हे क्रमांकांमध्ये पसरलेली आहे.


या संपूर्ण व्यवहारासाठी सचिनने सुमारे ₹४.२० कोटी स्टॅम्प ड्युटी भरली असून, नोंदणी शुल्क सुमारे ₹९० हजार असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. ही मालमत्ता नंदन धनंजय मेहता आणि विवस्वत धनंजय मेहता यांच्याकडून खरेदी केल्याचे नोंदणी कागदपत्रांवरून समोर आले आहे.

# 'पीसीबी'ने पैसे थकवले -गिलेस्पी

**सिडनी** : पाकिस्तान क्रिकेटमधून बाहेर पडल्यानंतर जवळपास दोन वर्षांनी ऑस्ट्रेलियाच्या जेसन गिलेस्पी यांनी आतापर्यंतचे सर्वात परखड भाष्य केले आहे. गिलेस्पीने 'पीसीबी'च्या हाय परफॉर्मन्सचे संचालक आकीब जावेद यांनी आपले काम कमकुवत करण्याचा प्रयत्न केल्याचा गंभीर आरोप केला असून पीसीबीकडून अद्यापही आपले हजारो डॉलरचे पैसे थकीत असल्याचा दावाही केला आहे.

गिलेस्पी यांची २०२४मध्ये पाकिस्तानच्या लाल चेंडूच्या संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी नियुक्ती झाली होती. त्याच काळात गॅरी कर्स्टन यांच्याकडे व्हाइट-बॉल संघाची जबाबदारी सोपवण्यात आली होती, मात्र पीसीबीने निवड प्रक्रिया व प्रशिक्षकांच्या व्यवस्थेत वारंवार बदल केल्यानंतर दोन्ही प्रशिक्षकांनी पदांचा राजीनामा दिला.









**उरण : पश्चिम समर्पित मालवाहतूक रेल्वे मार्गिकेच्या तीन महत्त्वपूर्ण टप्प्यांचे राष्ट्रार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे डबल स्टेक मालगाडीला हिरवा झेंडा दाखवून करण्यात आले. या कार्यक्रमाला जेएनपीटी येथे राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार, रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री भरत गोगावले, महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर आदी मान्यवर उपस्थित होते.**







# बीसीसीआयचा तीन मोठ्या ब्रँड्सशी करार

## ३५ सामन्यांतून कमावणार १२९ कोटी रुपये




**नवी दिल्ली : वृत्तसंसस्था**

जगातील सर्वात श्रीमंत क्रिकेट मंडळ असलेल्या बीसीसीआयने भारतीय क्रिकेट संघाच्या घरच्या मैदानावर होणाऱ्या सामन्यांसाठी एक मोठा आणि महत्त्वाचा करार केला आहे. या नव्या करारानुसार आता भारतात होणाऱ्या भारतीय संघाच्या प्रत्येक आंतरराष्ट्रीय सामन्यासाठी बीसीसीआयला तब्बल ३.७१ कोटी रुपयांची कमाई होणार आहे.

बीसीसीआयने घरच्या द्विपक्षीय मालिकांसाठी तीन नवीन एसोसिएट पार्टनर्सची निवड केली आहे. वृत्तानुसार हा करार एकूण ३५ सामन्यांसाठी असून मार्च २०२८पर्यंत लागू असणार आहे.

आता भारतीय संघ जेव्हा जेव्हा मायदेशात सामना खेळेल, तेव्हा या तिन्ही कंपन्यांची ब्रँडिंग मैदानात पाहायला मिळणार आहे. या लिलावात रिलायन्सच्या मालकीच्या 'कॅम्पा कोला' या सॉफ्ट ड्रिंक कंपनीने प्रति सामना १.३१ कोटी रुपयांची सर्वाधिक बोली लावून हक्क मिळवले आहेत. याशिवाय, 'एसबीआय लाईफ' आणि एआय चॅटबॉट कंपनी 'चॅटजीपीटी' या दोन्ही कंपन्या प्रत्येक सामन्यासाठी प्रत्येकी १.२० कोटी रुपये देणार आहेत. या तिन्ही प्रायोजकांकडून मिळून बीसीसीआयला एका सामन्यामागे ३.७१ कोटी रुपये मिळतील. ३५ सामन्यांच्या या संपूर्ण कराराची एकूण किंमत सुमारे १२९.८५ कोटी रुपये इतकी आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com